१८०१

अ. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. १८०१
१८०४

REFBK-0000225
REFBK-0000225

224

# प्रकाशकांचे दोन शब्द.

कवि कवित्वाचा प्रबंध ।
कवि नाना धाटी मुद्रा छंद ।
कवि गद्यपद्यभेदाभेद ।
पद्मासकर्ते ॥

—रामदास.

गद्य आणि पद्य हीं वाङ्मयाचीं दोन अंगें होत. हीं दोन्हीं अंगें जितकीं सुदृढ, सुस्थित, मोहक व विशाळ होतील तितकी वाङ्मयाची महती वाढणार, हें उघड आहे. महाराष्ट्रभाषेची पूर्व आणि सद्यःस्थिति हीं पाहिलीं, तर या दोन्ही अंगांत सारखा जोम, किंवा प्रमाणशीर वाढ आढळून येत नाहीं. पूर्वीं महाराष्ट्रसरस्वती-मंदिराला पद्यस्तंभाचाच विशेष आधार होता व लोकांतहि काव्याचीच गोडी व भक्ति बाणली होती. गद्याची मांडणी नीटशी बसली नसल्यामुळें, तें अंग बहुतेक लुलें पडल्यासारखेंच होतें. परंतु १९ व्या शतकांतील क्रांतीनें गद्य बरेंच उदयास आलें, नवीन नवीन विषयांवर गद्यग्रंथ प्रकाशित होऊं लागले, व सर्वत्र विद्याप्रसार होऊन महाराष्ट्रभाषेचे ग्रह उच्चीचे आले, असें भासूं लागलें. परंतु या गद्यप्रसाराबरोबर पद्यग्रंथांची ह्मणजे काव्याची पिच्छेहाट होऊं लागली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परकी अंमलानें समाजांत एक प्रकारची विचारक्रांति सुरू झाली, व पूर्वींच्या काव्यग्रंथांचें वाचनदेखील सुशिक्षित वर्गांत हळहळू मागें पडूं लागलें. या काळींहि नवीन कवि उत्पन्न झाले, परंतु पूर्वकवींप्रमाणें त्यांच्या हातून विशाळ रचना झालेली आढळून येत नाहीं. शिवाय या कवींविषयीं पूर्वींच्या कवींप्रमाणें लोकांमध्यें आदरबुद्धि असण्यासारखी हल्लींची स्थितीच नाहीं! अगदीं

अलीकडील स्थिति पाहिली तर बहुतेक सुशिक्षित लोक विशेषें-करून आंग्ल वाङ्मयांत व सामान्य वाचक महाराष्ट्रभाषेंतील नाटकें, कादंबऱ्या यांसारख्या मनोरंजक गद्यपुस्तकांत गढून गेलेले आढळतात; आणि ह्मणून आमच्या आधुनिक कवींची जितकी बूज व्हावी, तितकी होत नाहीं. हें काव्यसृष्टीचें युगच नाहीं, असाहि शेरा कांहीं विद्वान् ठोकून देऊं लागले आहेत ! आधुनिक कवींच्या कृती बहुतेक स्वल्प, स्फुट व प्रासंगिक असल्यामुळें, त्या बहुशः वर्तमानपत्रें किंवा मासिक पुस्तकें यांतूनच प्रसिद्ध होत असतात. परंतु त्यांचें वर्ष पुरें होऊन अंक एकत्र बांधिले गेले, ह्मणजे या कृती गडप होतात व त्यांच्या अस्तित्वाचें कोणास भानहि उरत नाहीं, असें अनुभवास येतें ! मुद्रणकलेचा उदय झाल्यामुळें हस्तलिखित प्रती करण्याची व त्या नीट जपून ठेवण्याची प्रथा प्रायः नाहींशीच झाली आहे. तेव्हां हाच क्रम जर अजून कांहीं वर्षें चालू राहील तर आज जुने ऐतिहासिक लेख व काव्यें मिळविण्याचें काम जितकें दगदगीचें व निराशाजनक झालें आहे, तितकेंच हल्लींच्या कवींच्या शेंकडों सरस कृती संपादन करण्याचें कामहि आपल्या पुढील पिढीला श्रमकर व कठीण भासेल, अशी भीति वाटूं लागली आहे ! यासाठीं या अनिष्ट प्रसंगाचें अंशत:तरी निवारण व्हावें, आमची काव्यसंपत्ती चिरकाल रहावी, व आमच्या आधुनिक कवींच्या चिमुकल्या मनोहर कृती नेहमीं ठळक रीतीनें लोकांपुढें रहाव्या, अशी जी आमची फार दिवसांची उत्कट इच्छा, तिचेंच फळ हा 'कुसुमगुच्छ' होय. अशा रीतीनें आमच्या कविबंधूंचें ऋण मधूनमधून अंशत:तरी फेडण्याच्या कामीं आमचे वाचक आह्मांस उत्तेजन देतील, अशी बळकट उमेद आहे.

वा.क्र.१०५४ ३०८


प्रस्तुत गुच्छांतील काव्यकुसुमें अभिनव असून तीं मनोरंजनाच्या आजकाल नाणावलेल्या कविमंडळाचींच घेऊन गुंफिलीं आहेत, हें विषयानुक्रमांतील काव्यांच्या आणि कवींच्या नामावळी-वरून सहज ध्यानांत येईल. या गुच्छांतील काव्यांत रसवैचित्र्य व विषयविविधत्व साधण्याचा शक्य तितका प्रयत्न करण्यांत आला आहे. या ठिकाणीं कवींची तुलना करण्याचा आमचा मानस नाहीं. शिवाय 'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायानें पहातां एका व्यक्तीनें केलेली तुलना सर्वमान्य होईल असेंहि नाहीं. परंतु येथें आह्मी इतकेंच नमूद करितों कीं, या गुच्छांतील प्रत्येक कुसुमांत कांहींतरी विशेष गुण ठळक रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतो व प्रत्येकाचें स्वरूप व त्यांतील मनोहरत्वाचा हेतु दुसऱ्यापासून भिन्न आहे. कोणी कवि विस्तृत, विरळ व उच्च वातावरणांत कल्पनेच्या तरंगावर विहार करितो, तर कोणी घन, सखल व व्यवहार्य हवेंतच लोकांची मैत्री संपादितो! कोणाचे विचार व रचना यांचीं ठाकठिकीची मांडणी हेंच रमणीयत्व तर कोणाची भोळीभाबडी रचना हीच जादू! कोणी संस्कृत कवींचे सहचर तर कोणी आंग्लांचे मित्र! कित्येक एकदम मुद्द्याशींच गांठ घालणारे, तर कित्येक सूचक उद्गारांतच समाधान मानणारे! कोणाचें मृदु मनोहर पदलालित्य कानांत सतारीप्रमाणें गुणगुणतें, तर कोणाचा वाक्प्रवाह संथ व गंभीर गतीनें अंतःकरणांत प्रवेश करितो! तेव्हां अशा परस्पर–भिन्न कृतींची तुलना करून तारतम्य ठरवूं पहाणें, ह्मणजे आंबा चांगला, कीं द्राक्ष चांगलें हें ठरवूं पहाण्यासारखेंच आहे! हे काव्याचे निरनिराळे मासले आपापल्या परीनें मनोहरच आहेत व हे या चिमुकल्या पुस्तकांत वाचकांस आढळतील, अशी आमची खात्री आहे.

असो. अशा तऱ्हेचे कुसुमगुच्छ आमच्या देशबंधूंस वारंवार सादर करण्यापुरतें उत्तेजन महाराष्ट्रवाचकवर्गाकडून आह्मांस मिळो, अशी सद्बुद्धिप्रेरक दयाघन परमेश्वराजवळ नम्र याचना करितों.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीचें
ऑफिस, गिरगांव–मुंबई,
ता० ३० सपटेंबर १९०४.

**काशीनाथ रघुनाथ मित्र,**
म० ग्रं० प्र० मंडळीचे व्यवस्थापक.

# विषयानुक्रम.


प्रकाशकांचे दोन शब्द. ... ... ... ... ...

कुसुम १ लें, **प्रियोपलब्धि**—श्रीयुत श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए. ५

कुसुम २ रें, **एका फुलाचा इतिहास**—श्रीयुत नारायण वामन टिळक. २५

कुसुम ३ रें, **तारातरंग**—श्रीयुत चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे. ३७

कुसुम ४ थें, **प्रीतीचा वास**—श्रीयुत भास्कर रामचंद्र तांबे. ४२

कुसुन ५ वें, **कराल करवाल**—श्रीयुत विद्याधर वामन भिडे, बी. ए. ४४

कुसुम ६ वें, **कृष्णाकुमारी**—श्रीयुत विनायक जनार्दन करंदीकर. ५२

कुसुम ७ वें, **विदुलापुत्रानुशासन**—श्रीयुत बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए. ५६

कुसुम ८ वें, **स्वप्न**—श्रीयुत नरहर शंकर रहाळकर, बी. ए. ६४

कुसुम ९ वें, **झपूर्झा**—श्रीयुत कृष्णाजी केशव दामले. ६८

कुसुम १० वें, **दंवाचे थेंब.** ,, ७१

कुसुम ११ वें, **रांगोळी घालतांना पाहून.** ,, ७२

कुसुम १२ वें, **भृंग.** ,, ७४

# THE POET'S MIND.

× ×     × ×

In the heart of the garden the merry bird chants
With a low melodious thunder.

× ×     × ×     × ×

Vex not thou the Poet's mind
With thy shallow wit:
Vex not thou the Poet's mind;
For thou canst not fathom it.

Clear and bright it should be ever,
Flowing like a crystal river
Bright as light and clear as wind.

× ×     × ×     × ×

TENNYSON.

# कुसुमगुच्छ.

## कुसुम १ लें.

224

### प्रियोपलब्धि.

सोमवंशोद्भव प्रसिद्ध राजा **पुरूरवा** हा आपली प्रियकरिणी **उर्वशी** इजबरोबर हिमालयपर्वतावर आनंदानें विहार करित असतां उर्वशी प्रणयकुपित होऊन व राजा सविनय विनवणी करित असतांहि त्याचा धिक्कार करून एकाएकीं निघून गेली. तेथून जवळच गंधमादन पर्वताशेजारीं अकलुष नांवाचें वन होतें. तेथें पूर्वी कुमार कार्तिकेय हा वसती करित असे. स्त्रियांचा मुळींच संपर्क होऊं नये ह्मणून त्यानें 'या वनामध्यें जी स्त्री येईल ती लता होऊन पडेल व गौरीचरणरागसंभव जो संगमनीय मणि त्यावांचून तिची मुक्तता होणार नाहीं' असा नियम केला होता. रागाच्या आवेशांत उर्वशीला त्याचें स्मरण राहिलें नाहीं. यामुळें ती तेथें गेली व एका कोपऱ्यांत लता होऊन पडली. इकडे राजा विरहानें वेडा होऊन उर्वशीचा शोध करित रानोरान हिंडूं लागला. वाटेमध्यें जे जे पशुपक्षी भेटले, त्यांना त्यांना त्यानें उर्वशीचा वृत्तान्त विचारिला; परंतु त्यांच्यापासून त्याला कांहींच समजलें नाहीं. याप्रमाणें भटकत असतां दैवगतीनें त्याला वाटेंत संगमनीय मणि सांपडला. तो घेऊन लतारूपिणी उर्वशीला स्पर्श करितांच ती अकस्मात् प्रगट झाली. याप्रमाणें उर्वशीची प्राप्ति होतांच राजा तिजसह आनंदानें आपल्या नगरीं गेला. इतका प्रसंग पुढील कवितेंत संस्कृताचा आधार घेऊन वर्णिला आहे.

दिसे परम कान्तिमान् हिममहीध्र मेघोद्भवें,
मयूर युवतीपुढें करिति गान लीलोत्सवें,
स्त्रिया सहसिता तशा कुसुमिता लता शोभती,
जणों स्तनितविव्हला तरुवरास आलिंगिती! १

महाशिखरलंबिनी, गगनमंडलव्यापिनी,
तडिद्वलयभासिनी, तृषितचातकानंदिनी,
तमालरुचिहारिणी, सजल नील कादंबिनी,
अपार जल वर्षुनी करि सुशान्त ही मेदिनी. २

कदंबतरु त्यावरी मृदुल मारुतें डोलती,
दिसे अरुण-गैरिक-प्रकर-कान्तिमान् संप्रती;
किती करिति कौतुकां कनक-केतकी-काननें,
पयोद समयास तो गिरि हरी जनांचीं मनें. ३

नवस्फुटित-मालती-बकुल-यूथिका-काननीं,
विलाससुख भोगुनी बहुत भागला जो मनीं,
नवांबुकणशीतलानिल इतस्ततां वाहतो
समस्त वसुधातलां कुसुमसौरभें व्यापितो. ४

मनोरम तडिन्नटी गगनरंग-भूमीवरी
प्रभावलयमेखलाललित नृत्यलीला करी;
विलासगतिविभ्रमां बहुत दाउनीयां खरी
शिरे जलदमालिका-जवनिकान्तरीं सत्वरी. ५

जशी चपलता वरी कुचरिता अमर्याद ती,
नवांबुपरिपूरिता गिरिनदी तशी संप्रती;
विदारि सकलां जशी नियति सर्व सर्वंकषा,
निकुंजसरिता तशी तटतरूस कूलंकषा. ६

प्रफुल्लकुसुमोत्करा तरुलतावली सुंदरा,
पयःकणपरंपरा विमल रम्य मुक्ताहरा,
विलेखिततृणांकुरा मरकतप्रभाभासुरा,
जणों जनमनोहरा हरित शालु नेसे धरा! ७

दिशा घनसमाचिता, मधुर धीर मेघध्वनि,
सुरम्य सुरकार्मुक, प्रकटकेलिसौदामिनी,
प्रमत्तशिखिगर्जना, कुसुमसन्नता वल्लरी,
सदा परम यातना करिति कामिसार्थी खरी. ८

पयोदसमयीं अशा नृपतिचक्रचूडामणि
फिरे विगतचेतन प्रथित पूरुनामा वनीं;
न भान लवही तनूवरि पदोपदीं तो पडे,
बघे स्तिमितलोचनीं सजल अंतरिक्षाकडे. ९

प्रिया प्रणयिनी सखी युवतिरत्नभूषा खरी,
जिला बघुनि लज्जिता कमलजा स्वयें अन्तरीं;
अशी मदनमंजरी हृदयवल्लभा सुंदरी
प्रनष्ट वनिं जाहली, नृपति शोध तीचा करी. १०

वदे स्वगत भूपती "अहह! सुंदरी! उर्वशी!
कशी हृदयवल्लभा त्यजुनि दूर जाशी अशी?
तव प्रियचकोरका असहनीय ही यातना,
मनस्तिमिरनाशिनीधवल चंद्रिके! त्वद्विना ११

मला विकल पाहुनी क्षणहि होशि तूं विव्हला,
अशी प्रियसखे! तुझी हृदयवृत्ति ती कोमला;
कसें असहनीय हा विरहताप भोगावया
सखे! अहह! टाकिलें विजन काननीं स्वप्रिया? १२

मराठी

प्रदीप्तविरहानलें हृदय सर्वदा हें जळे,
न ताप मज आकळे, सकल धीर माझा गळे;
तुला सकल हें कळे, मग विमानिलें कां बळें?
कसें कठिण जाहलें सरस चित्त तें आगळें! १३

'त्रिविष्टपनिवासिनी अमरमान्य मी अप्सरा,
महीतलनिवासि हा परम हीन राजा खरा;
असे नरसमागमा उचित काय देवांगना?'
असें समजुनी मनीं खचित सोडिलें या जना! १४

सखे! धरुनि ही खरी अनुचिता कुशंका मनीं
उगाच तुज दूषितों, अधम सत्य मी, मानिनी!
असे प्रणयपूर्ण तें विमल चित्त ठावें मला,
न देइ कधिं ठाव तें लवहि दुष्ट शंका-मलां. १५

प्रसादनपरा नतां सुरवरांस धिःकारिलें
तुवां मजसि मानवा सुदति! आदरें सेविलें!
तशीच अवमानुनी अतुल-दिव्य-भोगस्पृहा,
अनर्थमय सेविला सखि! मदर्थ भूलोक हा! १६

अलभ्य सुखभोग जे शतमखासही सर्वथा,
दिले सुचिरकाल ते मज विलासिनी! तत्वता;
सुरोपवनतुल्य जीं असति रम्य हीं काननें,
विलाससुख त्या स्थलीं अमित भोगिलें शोभने! १७

विपत्समय संप्रती अहह! पातला हा खरा,
मनोरथशतास्पदा मजशि लोपली सुंदरा!
विलाससुखसाक्षि जे परम रम्य भूभाग हे,
तुझ्याविण मनोव्यथा बहुत देति आतां सये! १८

तृषाकुल चकोरकां सुखवितां शरच्चंद्रिका
अकाल-घन ज्यापरी हरि तिला अकस्मात् निका!
तशी मदनमंजरी मम विलोचनानंदिनी
कुणीं अहह! चोरिली? मधुमती सुधास्यंदिनी! १९

तमःप्रकर पावला प्रसर काय हा सुंदरी!
तुला विजनकाननीं विकल शोधुं कोठें तरी?
भ्रमिष्टसम एकला फिरतसें विमार्गें वनीं,
बघेन तरि तो कधीं वदनचंद्रमा लोचनीं. २०

अहा! असुर दुष्ट हा हरुनियां तिला नेतसे,
सखी गगनमंडळीं कशि तडित्समा ती दिसे!
सखीस हरुनी कुठें खल! पळून जाशील रे?
तुझें मरण योजिलें खचित ईश्वरें मत्करें. २१

महानरपतिप्रिया प्रथित उर्वशी सुंदरी,
तिला मरणभीति तूं त्यजुनि नेसि कैसा तरी?
कधीं शलभ वांचला शिवुनियां प्रदीप्ता शिखा?
न काक कलहंसितें अभिलषूनि पावे सुखा! २२

अशस्त्र मज पाहुनी निजशरासनां कर्षि तो,
कसा अविरला अहा! खल शिलीमुखां वर्षितो;
परी समरधीर हा नृप ढळेल कैसा खला!
वधीन बलशालि मी त्वरित लोष्ठघातें तुला. २३

निशाचर खलाग्रणी नच, पयोद संनद्ध हा,
दिसे सुरशरासन प्रकट, चाप नोहे पहा,
न ही शरपरंपरा, पडति वारिधारा-सरी,
न हेमनिकषोपमा प्रियसखी तडित् ही खरी! २४

सुवर्ण–कदलीहुनी मृदुल ऊरु जीचे खरे,
मला त्यजुनि एकली त्वरित गेलि कोठें बरें!
असेल वनिं बैसली कुपित गुप्त ती सुंदरी,
तडिद्विलसितापरी क्षणिक कोप तीचा परी. २५

न जाइल सुरालया मदनुरक्त ती सुंदरी,
समीप असतांहि मी असुर काय तीतें हरी!
तिला मजविणें कदा नच विलासही आवडे,
त्यजून मग ती मला त्वरित गेलि कोणीकडे! २६

विपत्तिसमयीं नरावरि अनर्थ येती स्वयें,
सुधी वदति यापरी, वचन सर्वथा तथ्य हें;
वनीं त्यजुनियां मला सुमति दूर गेली अहा!
अशांत अतिरम्य हा जलदकाल आला पहा. २७

पयोदसमयीं अशा, वनिं विनष्ट झाली सखी,
असे जगतिं आपदा इतर काय यासारखी!
सभाग्य जनही मनीं बहुत होति पर्युत्सुक,
कसे अहह! वांचती विरह-तप्त ते कामुक! २८

वियोगपरितप्त मी, जलद! वृष्टि ही आंवरीं,
विदीर्ण करितोस का वसुमतीस धाराशरीं?
जरी भटकतां वनीं मज दिसेल बिंबाधरा,
तरी मम मना तुझा सुखद ताप सारा खरा! २९

असे नियम 'कारण प्रभुचि होय काळां' असा,
करूं त्वरित काय मी जलद-काल हा नाहिंसा!
नकोच अथवा, गमे परम मित्र हा अन्तरीं,
वनांत निजलक्षणीं मम नृपोपचारां करी. ३०

तडिद्रुचिर अभ्र हें मम वितान शोभे खरें,
स्वयें हलविती नभीं निचुल मंजरी-चामरें;
शिखंडि मम बंदि हे, सुखवि काल हा फार ज्यां,
मला नगवणिक्तती वितरि रम्य धारास्रजा. ३१

परिच्छद न हा प्रियाविरहिता मला आवडे,
कसें विकल जाय हें हृदय बाह्यसौख्याकडे?
अहा! प्रसर पावला तिमिर-भार नेत्रापुढें,
कशी मजशि संप्रती हृदयवल्लभा सांपडे! ३२

मनोज्ञ नवकंदली रुचिर शोभते ही किती!
तशीच कुसुमावली सलिलगर्भ आरक्त ती;
विनोदकुपितप्रियानयन रक्त बाष्पाकुल
इला स्मरति, पाहुनी करि नितान्त ही व्याकुल. ३३

असेल वनिं गेलि ती सुमति याच मार्गें जरी
जलार्द्रसिकतेवरी निकट काननाभ्यंतरीं
नितंबगुरुतेमुळें रुचिर, खोल मार्गे अशी
दिसे न पदवी न वा पथिं अलक्तकांका कशी? ३४

मला त्यजुनि गेलि ती खचित याच मार्गें सती,
स्तनांशुक तिचें अहा! गलित जाहलें हें पथीं;
नवाश्रुजलबिंदु जे अधररागरक्ताभ ते,
पडोनि किति शोभते नवशुकोदरश्याम तें. ३५

तुझें वसन लाधलें, खचित भाग्यवान् मी प्रिये!
स्वजीवितसमान तें जपुनि ठेवितों गे! स्वयें;
अहा! वसन हें नव्हे! अहह! काय आपत्ति ही!
खरीच नवशाद्वला रुचिर सेंद्रगोपा मही! ३६

असे विजन सर्वही विपिन, मार्ग हे वांकडे,
करी घन पुनःपुन्हां सलिलवृष्टि चोहींकडे,
तनू तपन तापवी, तरिहि हिंडतों या तमीं,
कथील तरि कोण तो सुमुखिची मला बातमी! ३७

हले प्रबळ वायुनें बहुत रम्य ज्याचा तुरा,
भरी करुनि गर्जना गगनभाग सारा पुरा,
शिलेवरि बसोनियां करुनि मान अत्युच्च हा
पहात जलदाकडे गिरिमयूर येथें पहा. ३८

वनीं विहरतां गड्या! हृदय-वल्लभा सुंदरी
पथांत शितिकंठ! तूं वद विलोकिली कां तरी?
प्रवृत्ति कथुनी तिची सुखविं विव्हला या जना,
तुला कथिन सर्वही त्वरित सुंदरीच्या खुणा. ३९

तिचें वदन पाहुनी गलितगर्व राकापति,
विलासगति पाहतां मनिं मरालही लाजती;
विलोलहरिणीपरी सुभग दृष्टि ती आयता,
दिसे बहुत भागली बघ नितंबिनी चालतां. ४०

शिखी परम दुष्ट हा, विगणुनी ममाभ्यर्थना
कसा मुदित मानसें अधम लागला नर्तना!
दिसे सुखित कां असा मज बघून दुःखातुरा,
अहा! समजला मला खचित हेतु याचा पुरा! ४१

प्रसार मृदुमारुतें घनकलाप जो पावला,
प्रिया हरपतां वनीं अतुलतेस तो पोंचला;
अजून असता जगीं अलकपाश तीचा जरी,
तयास जन कोण तो मग विचारिता रे तरी! ४२

बघून परसंकटां बहुत हर्ष जे पावती,
अशा कुचरितां खलां दुरुनियां करावी नती!
अशाहि अधमांमधें गमसि अग्रणी तूं खरा,
मनोहर वरूनियां, मलिन अन्तरीं, पामरा! ४३

मदोद्धत तपात्ययीं बहुत जाहली जी खरी,
अशी परभृता अहा! दिसत राजजंबूवरी;
समस्त विहगांमधें परम पंडिता होय ही,
प्रवृत्ति सखिची तिला तरि विचारितों सर्वही. ४४

अये मधुरभाषिणी परभृते! अये कोकिले!
कथीं, विपिनिं काय तूं युवतिरत्न आलोकिलें?
वदे तुजपरीच ती कलरवां सुहास्यानना,
प्रवृत्ति कथुनी तिची सुखविं दुःखिता या जना. ४५

तुला मदनदूतिका वदति सत्य कामी जनीं,
क्षणांत करिसी अये! गलितदर्प तूं मानिनी!
असेल सखि ज्या स्थलीं त्वरित नेइं तेथें मला,
सखीस समजावुनी नतरि आण येथें तिला. ४६

विचारि मज ही अहा 'हृदय-वल्लभा सुंदरी
तुला त्यजुनि काननीं त्वरित गेलि ती कां तरी?'
गडे! दुखविलें नसे कधिंहि अल्प तीतें पहा,
अकारण वरानना कुपित जाहली ती अहा! ४७

असह्य परदुःख हे खचित मानिती शीतल,
वनीं फिरतसें प्रियाविरहयातनाव्याकुल;
तरी विगणुनी मम प्रणय दुष्ट ही कोकिला
कशी मुदित, खातसे मधुर पक्क जंबू-फलां! ४८

जशी कलरवा सखी, असिसि कोकिले! तूं तशी,
क्षमा करितसें पहा ह्मणुनि पापशीले! तुशीं;
तरी सपदि येथुनी निघुन दूर जावें कसें,
खला विनवितां नरा बहुत हीनता येतसे. ४९

लतातरु-निकुंज जो दिसत वामभागीं वनीं,
अहा तिथुनि येतसे मधुर नूपुरांचा ध्वनि;
प्रिया कुपित एकली फिरत काय तेथें खरी,
स्वयें जवळ जाउनी झडकरी पहातों तरी! ५०

दिशा बघुनि सर्वही नवपयोधरश्यामला,
मरालगण मानसोत्सुक सरोवरीं बैसला;
पहा मधुर कूजती नव मरंद ते सेवुनी,
नव्हे श्रवणहारि हा अहह! नूपुरांचा ध्वनि! ५१

प्रफुल्लकमलाकरां बघुनि सर्व हे बैसले,
जरी हृदय मानसोत्सुक विशेषतां जाहलें;
अहा! उडुनि जातिल त्वरित येथुनी हे दुरी,
प्रवृत्ति सखिची तयां तरि विचारितों तोंवरी. ५२

क्षणांत मग जाशिल प्रथित मानसा सन्मते!
त्यजीं क्षणभरी तरी कमलनाल पाथेय तें;
प्रवृत्ति सखिची कथीं झडकरी विहंगेश्वरा!
सुधी स्वहित टाकुनी निज जनार्थ साधी खरा. ५३

'असे हृदय मानसोत्सुक ह्मणून ती सुंदरी
वनीं विहरतां पथीं नच विलोकिली मीं खरी;'
असें नृपवरा खला! वितथ सांगसी तूं कसा?
विलासगति ही तरी शिकविली कुणीं लालसा? ५४

जिचा गतिविलास हा ललित सत्य तूं चोरिला,
मम प्रियतमा शठा! त्वरित देइं ती कोमला;
मला गवसली तुझ्याजवळ रम्य तीची गति,
न संशय तुवांच ती खचित चोरिली श्रीमती. ५५

'खलां नियमुनी मही नृपति शासितो हा नयें'
असें समजुनी कुधी उडुनि दूर गेला भयें;
सखीसहित बैसला पथिं रथांगनामा[1] अहा!
प्रवृत्ति मजला तिची त्वरित सत्य सांगेल हा. ५६

रथांगजघना सखी वद रथांगनामन् पथीं
विहार करितां तुला विपिनिं भेटली काय ती?
विचारि मजला अहा 'असशि कोण तूं?' हा असें,
अरे! प्रथित भूप हा, विदित काय तूतें नसे? ५७

महाभिजन चंद्रमस्तपनवंशजन्मा जनीं,
प्रतापनिधि पूरु जो नृपतिचक्रचूडामणि,
जयास वरिती स्वयें धरणि उर्वशी सुंदरी,
अरे न परिसे! खला तरि विदारितों वाक्शरीं. ५८

सखी तव सरोवरीं कमलिनीदलें झांकतां,
तिला समजुनी दुरी विलपसी किती तूं स्वतां!
असह्य तुजला तिचा विरह वाटतो यापरी,
प्रवृत्ति सखिची मला मग न सांगसी कां तरी? ५९

पराग्वदनशालि हें नशिब सर्वथा जाहलें,
अनुत्तम ह्मणोनियां युवतिरत्न तें लोपलें!

---

१ चक्रवाक.

तरी इथुनि जाउनी इतर भाग हे पाहवे,
परी अहह! येथुनी मज न सर्वथा हालवे. ६०

अहा! भ्रमर ज्यामधें मधुर कूजितातें करी
असें कमल सत्य हें मज निरोधि मार्गान्तरीं;
जसें अधर चुंबितां मुख तिचें ससीत्कार तें
विलाससमयीं, तसें परम रम्य हें शोभतें! ६१

करोनि मधुपान हा मधुप मत्त झाला किती!
कळेल तरि का तया मम विपद्गता ही स्थिती!
पुसेन तरिही तया सकल वृत्त मी या क्षणीं,
पुढें न परिताप हो इथुनि दूर जातां वनीं. ६२

श्रुत्ति मदिराक्षिची सकल सांग तूं सत्वरी,
नसेच अथवा तुवां वनिं विलोकिली सुंदरी?
द्विरेफ! मिळतां जरी सुरभि तन्मुखोच्छ्वास रे!
कसें सुखद अल्पही कमल वाटतें हें बरें? ६३

कदंबविटपावरी करुनि सोंड हा आपली
करेणुसह बैसला वनकरींद्र छायातलीं;
पुसेन सखिचें तया सकल वृत्त मी सत्वरीं,
त्वरा न अथवा बरी अनुचिता घडी ही खरी. ६४

जयास फुटले नवांकुर असा प्रियेनें पहा
तयाजवळ आणिला रुचिर शल्लकी-भंग हा;
तरी मधुर आसवासमचि त्यांस सेवो सुखें!
पुसेन मग मी तिचें सकल वृत्त त्याला निकें. ६५

गजें कवल भक्षिला तरि विचारितों सत्वरी,
'वनांत फिरतां दुरी बघितलीस का सुंदरी?

अहा! युवतिवर्गिं जी शशिकलेपरी शोभते,
तसे रुचिर यूथिकाशबल राजती केश ते. ६६

अहा! करुनि गर्जना घनगभीर नागेंद्र हा,
प्रवृत्ति मदिराक्षिची मज समस्त सांगे पहा;
असे परम साम्यता प्रकट सत्य आह्मांमधें,
ह्मणोनि मजशीं असें द्विरद मित्रभावें वदे. ६७

नृपाधिपति सत्य मी, द्विरदनाथ! तूंही महा,
तुझ्यापरिच याचकां सतत दान माझें पहा;
प्रिया तुज वशा, मला युवतिरत्न ती उर्वशी,
असे समचि हें, नसो विरहजा व्यथा ही तुशीं! ६८

सुखी सतत तूं रहा, निघुनि चाललों मी दुरी,
अहा! सुरभिकंदराख्य दिसतो पुढें हा गिरी;
सुरम्य नग हा सदा प्रिय सुरांगनांनां गमे,
बघेन सुदती सखीसहित काय येथें रमे? ६९

नभीं तिमिरभार हा अहह! काय कोंदाटला,
दिसेल तरि मार्ग हा चमकतां नभीं चंचला;
परी अहह! जाहला घन तडिल्लता-शून्य हा,
तरी न परतेन मी न पुसतां तयाला पहा. ७०

शिलोच्चय, वनान्तरीं मदन-वैजयन्ती खरी,
विहार करि कां तरी ललित अप्सरा सुंदरी?
असे परम पीवरस्तनभरालसा ती पहा,
तुझ्यापरि महीधरा! पृथु नितंब तीचे अहा! ७१

असे बहुत तो दुरी ह्मणुनि नायके भाषणां,
जरा जवळ जाउनी तरि विचारितों मी पुन्हां;

'विहार करितां वनान्तरिं जहालि दृग्गोचरा[1],
अहा! मम[1] विना तव[1] क्षितिभृता[1]! सखी सुंदरा?' ७२

'विहार करितां वनान्तरिं जहालि दृग्गोचरा[2],
अहा मम[2] विना तव[2] क्षितिभृता[2]! सखी सुंदरा!'
यथाक्रम असें वदे सकलही मला हा गिरी,
कथीं झडकरी तरी प्रियतमा कुठें ती खरी? ७३

असे भ्रमचि सर्व हा, नग न अल्पही बोलला,
प्रतिध्वनि मदुक्तिचा खचित कंदरीं जाहला!
वनीं भ्रमुनि सर्वतां अहह! जाहलों श्रान्त मी,
वरी मजशि मोह हा, हृदय मग्न झालें तमीं. ७४

वहात गिरिनिम्नगा सुरभितोदका कंदरीं,
तरंगशिशिरानिलां अनुभवीन येथें तरी;
नवांबुकलुषाहि ही सुखविते मनातें किती!
नसेच उरली मला इथुनि जावयातें धृति. ७५

रुवद्विहगमेखला, भृकुटि-भंगवीची अहा,
असे वसनफेन हा, शिथिल फार कोपें पहा;
कशी कुटिल जातसे स्खलित पाहुनी ही पथीं,
मनीं परम कोपुनी धरि सखी नदीरूप ती! ७६

सखीस समजावितों मधुर भाषणें बोलुनी,
'नसे दुखविलें तुला कधिंहि अल्प मी मानिनी!
कशी वरुनि रुष्टता विरह-ताप-संवेदना
अनन्यगतिका नता अहह! टाकिलें या जना!' ७७

---

१ क्षितिभृता! (पर्वता!) ममविना सखी तव दृग्गोचरा जहालि (?)
२ क्षितिभृता! (राजा!) तवविना सखी मम दृग्गोचरा जहालि (!)

वदे वचन कां न ही? अहह! निम्नगा ही खरी!
मला त्यजुनि सागरा वरिल काय ती सुंदरी!
निराश नच होय मी लवहि, साहसा श्री वरी,
तरी प्रियसखीस त्या फिरुनि शोधितों कंदरीं. ७८

असे हरिण बैसला सुखभरांत सस्यावरी,
पुसेन सखिचें तया सकल वृत्त मी सत्वरीं;
सुरम्यनवशाद्वलांकुर पहावया काय हा
कटाक्ष जणुं फेंकिला विपिनदेवतेनें पहा! ७९

विमानुनि मला बळें वळवि तोंड हा आपलें,
मृगी परतुनी तयाजवळ यावयातें वळे
परंतु शिशु आडवी तिजशिं दुग्धपानार्थ तो,
कसा तिजकडेच हा स्तिमितदृष्टिनें पाहतो! ८०

अरे! वद मृगीपते! वनिं विलोकिली कां सखी?
कथीन तुज खूण ही तिजवरून तूं ओळखीं;
जशी सहचरी तुझी सुभगदृष्टिनें पाहते,
तशीच पृथुलोचना हृदयवल्लभा जाण ते! ८१

मदुक्ति अवमानुनी सखिकडे विलोकीतसे!
असे उचित सर्व हें, नवल यांत कांहीं नसे!
नसे परिभवां उणें जरि विपद्दशा येतसे,
तरी इथुनि जाउनी विपिन शोधितों हें कसें. ८२

अहा! सुमति या पथें खचित गेलि मातें गमे,
कदंबतरु रक्त हा विकसतांच वर्षागमें;
शिखाभरण ती करी कुसुम घेउनीयां बळें,
असें विषम तें जरी-हि असमग्रतंतूमुळें. ८३

कुठें तरुवरा! मला त्यजुनि गेलि ती सुंदरा?
न देखिलि ह्मणोनियां हलविसी वृथा कां शिरा!
प्रमत्त अलिवृंद हा जमुनि रंगला ज्यावरी,
सुमोद्गम तिच्या पदाहतिविना कसा हा तरी! ८४

रहा तरुवरा! सुखी, त्यजुनि चाललों मी तुला,
सखीविरहिता प्रिया तव न पुष्पलक्ष्मी मला!
शिलाशकलवर्ति हें अरुण काय शोभे तरी,
अहा! चमकुनी कसें तिमिरभार सारा हरी! ८५

प्रभावलयभासि हा हतगजामिषच्छेद न,
स्फुलिंग नच वन्हिचा, विपुल वर्षलासे घन,
कदंबकुसुमापरी मणि खराच रक्तच्छवि,
तयास उचलावया स्वकर लांबवी तो रवि! ८६

दिसेल बहु शोभिता मणि सुरम्य हा घालितां,
मनोहर शिखा जिची सुरभिदिव्यपुष्पान्विता;
जहालि वनिं नष्ट ती युवतिरत्नभूषा सखी,
कशास तरि घेउं हा मळविण्यास बाष्पोदकीं! ८७

'मनोज्ञमणि हा उमाचरणरागजन्मा खरा
अलभ्य जगिं मानवां, त्वरित घेइं राजेश्वरा!
तयास धरिशी जरी निज शिरावरी सत्वरी,
मिळेल तुजला पुन्हां हृदयवल्लभा सुंदरी.' ८८

असें कवण हें कथी? खचित हा महात्मा मुनी
अनुग्रह करावया विचरतो सदा जो जनीं;
प्रियाविरहयातनातिमिरभारमग्ना मला,
तुझी वचनचंद्रिका गमतसे किती शीतला! ८९

मदीय हृदयेश्वरी जगिं खरीच लक्ष्मीसमा,
मणे! तिजसवें जरी करविशील तूं संगमा;
शिखामणि गड्या! तुला तरि करीन मी सत्वरीं,
जसा हर शिरावरी अमृतवर्षि चंद्रा धरी! १०

अरे! दिसतसे लता उदकबिंदुंहीं भूषिता,
नसे कुसुमिता तरी हरितसे मना सर्वथा;
तिला बघुनि कां तरी हृदय फार हें वेधलें?
जगीं प्रणयहेतु तो कधिं न मानवातें कळे! ११

जलार्द्रमृदुपल्लवा जणुं नवाश्रुधौताधरा,
विवर्जितविभूषणा कुसुमहीन ही सुंदरा;
द्विरेफ–विरुताविना दिसत काय चिन्ताऽवशा,
विमानुनि मला नताहि अनुतप्त झाली कृशा. १२

असे खचित तीच ही प्रियसखी लतारूपिणी,
धरीन तिजला तरी निजकरांहिं आलिंगुनी;
जसा सुमुखिचा तसा सुखवितो लतास्पर्श हा!
परी अहह! वाटते मम मनास शंका महा! १३

तिच्याविषयिं जें मनीं प्रथम कल्पितों सर्वथा,
क्षणांत मग सत्य तें सकल होतसे अन्यथा;
तिचाच मजला जरी खचित लाभला स्पर्श हा,
तरीहि सहसा मुळीं न उघडीन नेत्रां पहा! १४

अहा! नयनचातकप्रणयपूर्णकादंबिनी,
मनःकुमुदचंद्रिका प्रणयनिम्नगा शोभिनी,
सदा हृदयवर्तिनी, विकलगात्रसंजीवनी,
मदीयसुखवर्धिनी खचित तीच ही मानिनी!" १५

२२५

असें नृपति जों वदे तव सुरांगना श्रीमती
पुढें प्रकट जाहली त्यजुनियां लतारूप ती;
धरी निजकरीं नृपा कवळुनी सुहास्यानना,
तिला बघुनि बोलला मुदित राव या भाषणां:— ९६

" वियोगतिमिरामधें सपदि मग्न होतां सखी!
मृतास जशि चेतना मज तशी मिळालीस कीं!
अहा! परम निर्धना सुरलताच कीं लाभली!
मिळालि सुकृतें पुन्हां अतुल दृष्टि अंधा भली! ९७

वनीं भटकतां प्रिये! अमित सोशिली यातना,
नव्हेच अणुमात्रही तुज सुगात्रि! तत्कल्पना;
मला विकल पाहुनी जलद ताडि धाराशरीं,
दिसे न पथही लतातरुनिरुद्धभागान्तरीं. ९८

मयूर-गज-कोकिला-भ्रमर-चक्रवाकां वनीं
प्रवृत्ति पुसिली तुझी, कर पुनःपुन्हां जोडुनी;
परंतु अणुमात्रही मजसवें न कोणी वदे,
सखे! सुखनिमग्न हे सकल मत्त झाले मदें. ९९

तुझा वदनचंद्रमा सुदति! दूर होतां जरा
अहा! प्रियचकोर हा परम होतसे घावरा!
असे विदित पूर्ण हें सकलही तुला सुंदरी!
कसें विरहसागरीं मजशि लोटिलें यापरी?" १००

असें परिसुनी वदे सविनया गिरा सुंदरी:—
"खरीच अपराधिनी, बहु करा क्षमा सत्वरी;
अकारण तुम्हांवरी कुपित होउनी मी तदा,
दिली सदय या मना बहुत दुःसहा आपदा. १०१

हिमालयनगावरी अकलुषाख्य भागान्तरीं
धृतव्रत महातपा गुह निवास पूर्वीं करी;
करी नियम एक तो 'युवति येइ येथें जरी
मदुक्ति अवमानुनी, त्वरित होय ती वल्लरी!' १०२

सुरासुरवरासही नियति ही चुकेना खरी!
तुह्मांवरि तशी प्रिया कुपित होउनी अन्तरीं
विमूढहृद्या बळें गमन सत्य तेथें करीं,
तदा स्वतनु टाकुनी त्वरित जाहलें वल्लरी! १०३

दिलें असुख आपणां बहुत, सत्य मी पापिणी,
प्रिया! अहह! जाहलें ह्मणुनियां लतारूपिणी!
परी दिवस धन्य हा उगवला सुदैवें पुन्हां,
ह्मणोनि निजलोचनीं अजि विलोकिलें आपणां.' १०४

असें वचन ऐकुनी नृपति बोलला सत्वरीः—
"असे सकलही खरेंच उपपन्न हें सुंदरी!
मला बघुनि सुसही लव न धीर तूतें निघे,
तुला विरहजा व्यथा सहन कैंवि होईल गे! १०५

असह्यविरहाकुल प्रियसखी! तुला शोधितां
मला विपिनिं भेटला मुनि जगास जो शोधिता;
मनीं सदय होउनी मणि अमोघ हा देतसे,
ह्मणोनि अजि सत्य हें युवतिरत्न मातें दिसे. १०६

ललाटिं तुझिया महार्हमणि ठेवितां हा गडे!
प्रभा प्रसर पावुनी अरुणवर्ण चोहींकडे
प्रभातसमयीं सरोरुह रविप्रभाऽरक्त तें
तुझें वदन त्यापरी सुमति! रम्य हें शोभतें! १०७

वहात मृदुमारुत स्फुटितपंकजामोदि हा
कसा विखुरितो तुझा कचकलाप कान्ते! पहा!
घनावरण नील हें निजकरीं दुरी सारुनी
तुझें वदन हा अहा! रवि पहातसे चोरुनी! १०८

यथेच्छ करिं अंबुदा! श्रवणहारि धीर ध्वनि,
सदाहि शितिकंठहो! बहु निमग्न व्हा नर्तनीं,
करेणुसह तूं करीं द्विरदनाथ! लीला जलीं,
प्रिया निकटवर्तिनी, भय नसेच आतां मुळीं! १०९

तडिद्विलसितांहिं जें ध्वज-सनाथ कामेश्वरी!
सुरम्य सुरकार्मुक प्रकट चित्र तें ज्यावरी;
विमान करुनी असें नवपयोधराचें तरी,
विलासगमने! तयामधुनि ने मला मंदिरीं.'' ११०



## कुसुम २ रें.

# एका फुलाचा इतिहास.

मनांत किंवा जनांत किंवा वनांत सृष्टि सतीचा,
मित्र खरा जो निधीच निर्मल, निष्काम प्रीतीचा. १
सदा कौतुका करी तयेच्या बाप जसा कन्येचें,
दिसो कशीही गोड करोनी दावी रूप तयेचें. २
कामरूपिणी ज्याच्या पुढतीं सृष्टी लाजत नाहीं,
सदा हासते तोष पावुनी ज्याच्या मधुवचनांहीं. ३
जसे वसंता नवे नवे द्विज तैसे शब्द जयाला,
सदा सिद्ध नवकाव्यसाधनीं असती सेवायाला. ४
विचारसागर रम्य कल्पनालहरी उसळति जेथें,
अलंकाररत्नांस्तव मोहक झाला सर्व जगातें. ५
असा एक कवि देहीं ज्याच्या चैतन्यासम कविता,
निर्जन रानीं सहज एकला पावे फिरतां फिरतां. ६
तेथें पाही फूल नवें जें कधिं न पाहिलें पूर्वीं,
वदे कवी कीं, धन्य जाहली ह्याच्या योगें उर्वी! ७
जनांत किंवा वनांत किंवा नभांत पुष्पें सारीं,
पायांखालीं फुलें उमललीं कमलें हृत्कासारीं. ८
जिकडे तिकडे फुलें सुगंधें विश्व कोंदुनी गेलें,
सदा रसाचा प्रवाह चाले भ्रमर सदाचे धाले. ९
परंतु सारीं फुलें ह्यापुढें तुच्छ कवीला गमती,
इतर विषय विसरला, तन्मति ह्या नवपुष्पीं रमती. १०
जड जगताला मुग्ध वाटती पदार्थ कविचे ते ते,
मित्र बोलके परमसुखाचे कविच्या हृदया दाते. ११
कोण असा जो दर्शन कविचें घडतां हासत नाहीं?
बोलत नाहीं अत्यानंदें, प्रेमें नाचत नाहीं! १२

गाती पक्षी कविगानाचें प्रत्युत्तर मधु देती,
वृक्षलतांची श्रेणी वाणी त्यासह गोड वदे ती. १३
जातां जातां झरा कवीला पाहुन कुशल विचारी,
फार कशाला! तृणें तयासह रमती दीन बिचारीं. १४
असो; पाहुनी येतां जवळीं कविला सुम तें बोले:—
"ये! ये! ये! ये!" क्षणामधें तें घरचें जैसें झालें! १५
"आलों! आलों!" ह्मणत त्यापुढें अत्युत्कंठित जाय
हात पसरुनी आत्मसंयमीं होई क्षीणोपाय. १६
परंतु सुम तें तया वाटलें दचकुन सरलें दूरी,
मनीं खोंचला कीं ऐसें तें कवीश्वरा धिक्कारी. १७
जाता तेथुन तसाच परतुन, अरसिक जरि तो होता,
परि त्या रसिका कोठुन वाटे मानखंडना आतां? १८
उलट तयाचा प्रेमा वाढे अनल वायुनें जैसा,
अजिंक्य झाला पुराच आतां धिक्कारा उपहासा. १९
पुन्हां पुष्प तें हासुन वदलें "बसा, दुरोनी बोला!
जगदीशाला अर्पित मी हो! योग्य न मी स्पर्शाला! २०
दो दिवसांचें जीवित माझें अर्पीलें परमेशा,
ध्यावें त्याला आहें तोंवर, अन्य नसे मज आशा. २१
मला ठाउकें रसज्ञ आपण मित्र फुलांचे लोकीं,
ह्यास्तव अपुलें स्वागत केलें, लीन पदीं झालें कीं. २२
बसा घडीभर आपण दोघें परमेशाला गाऊं,
भक्तिरसाचें अनुपम, अद्वय, रुचिकर भोजन जेवूं." २३
हासुन बोले कवि त्या सुमना "पवित्र जागीं तूं साचें,
वैराग्याचें निधान दिसशी मजला भक्तिरसाचें. २४

परंतु जातें वनांत तव हें यौवन मित्रा! वायां,
ज्ञाते ह्मणती जन साधन हो पुरुषार्था साधाया. २५
निर्जन रानीं जेथें न दिसे एक सख्या! फुलझाड,
उंच शाल्मली, निंब, घोर वट, पिंपळ, दिसती ताड. २६
येथें तुजला कांटेझाडें व्यापुन जणुं नाहींसें
करावयाला तयार गगनीं नक्षत्रा घन जैसें. २७
फुला! दिसेना एकहि येथें भ्रमर तुझा तो आस,
दहापांच जरि फुलें रहातीं येता तीं शोधीत. २८
कोमलता ही! रंग तुझा हा! हास्य तुझें हें नामी!
सुगंध तव हा काय करीता जरि वसशी आरामीं!" २९
"उद्यानीं मम नाशच होता!" बोले कविला फूल
"वयें तरुण तूं परी अनुभवें दिसशी अजाण मूल!" ३०
वन्य पुष्प तें निस्पृह, पुरतें जगावरीं रुसलेलें,
नवल कशाचें त्या मान्याला अवमानुन जरि बोले. ३१
पुन्हां ह्मणे तें "स्वार्थी सारा मर्त्यलोक हा आहे,
दर्शन राहो दूर तयाचें, नांव न मजला साहे! ३२
थर थर थर थर पंख कांपती, उरलें नाहीं भान,
पुष्पीं रत मधुपास वाटतें पुष्पच पंचप्राण! ३३
स्वार्थासाठीं परि हें सारें, अमुची वेडी जात,
भ्रमराचें मज दर्शन नलगे न घडे जरि जन्मांत! ३४
ज्या ज्या सुमनीं रमेल तें तें तितक्यापुरतें त्याचा
जीवच! परि हें प्रेम न, सगळा लोभ नवीन रसाचा! ३५
नित्य करावें पुढें पुढें, मधु गाणें गावें, न्यावें
लुटून सुरसा, परी शेवटीं ओळख विसरुन जावें! ३६

कोण अशांच्या पाशांमध्यें पडेल सांग शहाणें?
योगी ह्मणती यास्तव कीं, सुख दूर वनांत रहाणें! ३७
भ्रमर एकला मात्र नीच नच, परि जग सारें नीच!
निश्चय झाला मम कीं, जगतीं निवास ही हानीच! ३८
फळें तोंवरी द्विजरायाचें गायन चाले वृक्षीं!
तींच संपतां होती परके वृक्ष आणखी पक्षी! ३९
कार्य साधितो तोंवर मिळती आशीर्वाद घनाला,
थोडा चुकतां शिव्याशाप मग देती लोक तयाला! ४०
'शितें तोंवरीं भुतें भोंवतीं' ह्मण ही साधी भारी,
परि अनुभूती सकल बुधांची हींत ओतिली सारी. ४१
जगीं चहुंकडे स्वार्थ, नीचता, मूर्खपणा, अभिमान,
हार मानुनी सापासाठीं कोण पुढें करि मान? ४२
उषा आणि मी परस्परांनां बघतां सस्मित होतों,
ह्या प्रीतीचा अनुभव जगतीं कोठुन दुसरा हो तो! ४३
दर्शन माझें हाच लाभ तिज, तद्दर्शन मज लाभ,
कधिं न ठाउका स्वार्थें केला अमुचा चित्तक्षोभ. ४४
कोठें रवि तो, क्षुद्र कुसुम मी कोठें, परि कुरवाळी,
सर्व उग्रता सोडुन मजला कन्येसम सांभाळी! ४५
दिशा दिशांनां सौरभ माझा वाहुन वायू नेतो,
नको नको मी ह्मणतां ह्मणतां मद्यश जगिं पसरीतो. ४६
सृष्टी ही हिममिषें मनोहर नव मोत्यांची जाळी
घाली मजवर, सजवी मजला माय तशी प्रतिपाळी! ४७
सोडुन असले मित्र निधी हे निष्कामप्रेमाचे,
धूळ जगाची माथां घ्यावी कोण ह्मणे कामाचें? ४८

गायन ऐकुन तुझें वाटलें ज्ञाता तूं कविराज,
परी जगासम तूंही मोहित मोहक समजे आज. ४९
सुंदर विषफल दिसे वरोनी जग हें आहे तैसें,
परि विषकृमिला पीयूषाचें निधान फळ तें भासे! ५०
जा! जा! जा! जा! रम तूं तेथें उद्यानीं वा सदनीं,
बुद्धिभेद मम करूं नको रे! तुझ्या लागतें चरणीं!" ५१
विस्मित होउन उगाच कवि तो फुलाकडे त्या पाहे,
जेथें प्रीती तेथें आशा क्षमा सर्वदा राहे. ५२
"काल जन्मल्या ह्या पुष्पाला अनुभव काय जगाचा?
आयकिलें तें खरें मानुनी बोले असली वाचा. ५३
रागावांचुन संभव कोठुन वैराग्याचा झाला?
काय उपजतां जग हें वाइट दिसलें ह्या पुष्पाला! ५४
नैसर्गिक ही बुद्धी असली कुठेंच जगतीं नाहीं,
स्वर्ग जगाला गणिती बाळें मानुष इतरें पाहीं. ५५
अनुभव ह्या पुष्पानें कथिले पुष्कळ, परि ते सारे
इतरांचे, नच ह्याचे, हें तों अनुभवहीन विचारें! ५६
दीर्घद्वेषी ह्या सृष्टीचा कोण असा आराती
ह्यास भेटला अपकारप्रिय अरसिक निर्दय कुमती?" ५७
प्रश्न असे निज मना विचारी, परंतु नच पुष्पाला,
कोमल फुल तें प्रत्याघाता योग्य न, ठाउक त्याला. ५८
मानसशास्त्रीं पूर्ण विशारद सहज कवीची जाती,
कुसुमांवरती तशांत त्यांची अमोघ विमल प्रीती. ५९
सस्मित होउन पुनरपि बोले मंजुल वचनीं सूरी,
त्या सुमनाचें कठिन सर्वदा रुसलेलें मन हारी. ६०

"फुला ! तूं तसा मीही होइन विशीर्ण एके दिवशीं,
निवास येथिल विवास केवळ सुमना ! मजशींतुजशीं. ६१
जगास अवघ्या परकें व्हावें जाउन दूर रहावें,
ह्या शीलाला कसें कळेना सज्जनशील ह्मणावें ! ६२
भ्याडपणाचा कीं स्वार्थाचा परमावधि हा होय,
अशा नराचा मृताहुनीही मृत झालेला काय ! ६३
क्षणभंगुर वय त्यांत असे हें यौवन दो निमिषांचें,
एकवार तनु वाळुन जातां ओझें जगता हीचें. ६४
वृक्षलतादिक परोपकारास्तव येती जन्माला,
नद्या वहाती, अंबुद गळती सुखवाया लोकाला. ६५
कृतघ्न हें जग जें तें स्वार्थीं रत, हें खोटें नाहीं,
परंतु तेणें प्रीतिकरांची प्रीती सरली नाहीं ! ६६
ताडन, घर्षण, अग्निनिवेशन यांनां स्वर्ण न भ्यालें,
परंतु यांहीं तेज तयाचें जगन्मान्य रे ! झालें ! ६७
जों जों होई छिन्न छिन्न तों मधुर मधुर हो ऊंस,
शिव्याशाप सोसून धरेला फलद करी पाऊस. ६८
शरीर झिजवुन चंदन देतो परदेहाला शांती,
स्वयें सोसुनी ताप तरूत्तम दे इतरा विश्रांती. ६९
भूगर्भस्थित हीरक सोडुन निवास बाहिर यावा,
स्वार्थिजनाच्या करीं पडावा, शाणोलीढहि व्हावा; ७०
कधीं कुधीच्या, कधीं सुधीच्या हातामध्यें जावा,
परंतु त्याला नित्य घडावी जगामधें जनसेवा; ७१
ह्यावांचोनी तत्तेजाचा हेतु न दुसरा कांहीं,
परमेशाचा नियम हा असा अभेद्य विश्वीं पाहीं. ७२

तुला सांगतों प्रिया! प्रसूना! ह्मणशी तूं जी भक्ती,
भक्ति न ती रे! परि परमेशीं स्वार्थास्तव आसक्ती. ७३
जगदीशाच्या निंदुन कृतिला स्तोत्रें त्याला गावीं,
निर्दय होउन त्या सदयाची पदवी जवळ करावी! ७४
कोण ह्मणे ही भक्ती? किंवा उपासना ही कसली?
जगचालका कशी आवडे मती जगावर रुसली? ७५
चल जगतीं तूं, रम उद्यानीं, भिऊं नको कवणाला,
सेव जनांला, तेणें होशिल मान्य फुला! देवाला. ७६
तुला पाहुनी स्मरुनी विरही विरहिणिच्या गालाला
तुझें प्रसूना! घेइल चुंबन नको निवारूं त्याला. ७७
पाहुनियां तें कुणी मानिनी होइल वश कोपातें,
तोडुन तुजला वाहिल वेणीकालसर्पिणीला ते. ७८
परि शालिन्या तुझ्या पाहुनी तीही वश होईल,
भूषणसम तुज नित्य फणेवर ती अपुल्या वाहील. ७९
तुझ्यामुळें ती नागिण होइल रसिकाला कमनीय,
वनवासी तूं असेंच राहुन कां होशी वचनीय? ८०
तुला पाहुनी रसपानास्तव येतिल भ्रमर कुसुमा!
परिवर्धित ते करितिल तव ही अनुपम अभिनव सुषमा. ८१
गुंजारव करितील कवी तो सूर धरुन गातील,
रसाळ, सुंदर, नवीन काव्यें रसिकजनां देतील. ८२
पुष्पशरासन इतरां सोडुन तुजला घेइल हातीं,
विरक्तिला तो जिंकुन राज्यीं स्थापिल मधु अनुरक्ती. ८३
नवपुष्पासम अंगकांतिनें, परि हृदयानें हीन,
जिच्या अनुनयीं कुणी जहाला पुरुषमणी अति दीन. ८४

हताश होउन तुला प्रसूना ! तिच्याकडे धाडील,
कल्पुनियां कीं तूंच शेवटीं विजयश्री वरिशील. ८५
फुला ! खरोखर तव सहवासें हृदय तिला येईल,
प्रेमल, कोमल, निर्मल धरितें पूर्ण फुलाचें शील. ८६
प्रियास देइल हृदय आपलें परत तुला देतां ती,
लहान नाहीं सख्या ! फुला ह्या परोपकृतिची महती ! ८७
निजदेशाच्या विभवरक्षणीं अर्पितदेह सदाचा,
तुला अर्पुनी करितिल कोणी मान अशा वीराचा. ८८
क्षतें तनूवर धरी भूषणें दिसतो अति विकराल,
तुझ्यापुढें परि कोमल होइल तोच विपक्षा काल ! ८९
फार कशाला ! कठोरवंशच्छेदक्षम भुंग्याचें
तुझ्यापुढें मुख मृदू जणूं तें घडिलें नवनीताचें. ९०
साधुजनाच्या चरणावरतीं वहातील तुज कोणी,
घेइल परि तो करांत तेव्हां होउं नको अभिमानी. ९१
नेइल तुज तो कुणा दुःखिता देइल कुसुमवरा ! रे !
कीं सहवासें तुझ्या हरावें दुःख तयाचें सारें. ९२
फुला ! असे तव होतिल लोकीं सदुपयोग बा नाना,
साधिशील तूं जन्मा येउन थोर थोर हेतूंनां. ९३
दैव तुझें परि खोटें कीं, तूं रानीं जन्मा येशी,
कधिं न जाणशी कवणा सोडुन तूं अपुल्या मायेशीं. ९४
फुलल्यापासुन दिशा दिशांनां वाहुन तव यश नेई
वायु, परी बा फुला ! अजोनी उपभोक्ता तुज नाहीं. ९५
स्यंदमान तव मरंद हृदयीं तुझिया वाळुन जाय,
सांग गड्या ! ह्याहून कोणता घडणें तुला अपाय. ९६

प्रकाश दृष्टी, चंद्र कुसुदिनी, मेघ धरा, तरु वेली,
शोभतील का? नांदतील का? जरी निराळीं केलीं!" ९७
परिसुनि वच हें पुष्प हासुनी वदलें "वा कविराया!
माझी ही स्थिति पाहुन वरिशी शोक कशाला वायां? ९८
निवास माझा जनांत होता कारण अपकाराला,
थोडेंसें मी तुला सांगतें मोज बघूं दे त्यांला. ९९
मदीय गंधें व्यापारांनां असते जन विस्मरले,
अनाघ्रात मग शरीर मम हें निर्मल नसतें उरलें. १००
नानाविध कुसुमें जीं असती त्यांचा रस शोषावा
ह्यावांचोनी ह्या जन्माचा अन्य हेतु नच ठावा. १०१
माझ्या मोहें त्या भ्रमरांच्या कुळांत भांडण होतें,
इतिहासज्ञां ठाउक आहे काय काय तें करितें! १०२
माझ्या छंदें फलद तरूंची करिता माळि उपेक्षा,
मींच रहावें दरीकंधरीं मज रुचतें त्यापेक्षां. १०३
किंवा मजला सर्प भयंकर वेष्टन घालुन रमता,
येती मग उपवनास माझ्या कालगृहाची समता. १०४
विकास माझा पुरा न झाला तोंच कुणी पोरांनीं
नेलें असतें मला तोडुनी लीलेनें अदयांनीं. १०५
वृद्ध ब्राह्मण किंवा कोणी येउन मजला नेता,
एक एक दळ माझें तोडुन देवार्चन साधीता! १०६
मम सौंदर्या पाहुन मजला बुद्धिपुरःसर नेते
प्रेतासंगें मातीमध्यें पुरिते वा जाळीते! १०७
तरुण नेउनी मला वहाता तरुणीच्या हृदयाला,
गाढालिंगनसमयीं येता विनाश मम देहाला. १०८

किंवा तल्पीं इतर फुलांसह जायापति मज रचिती,
चूर्ण करीती मम देहाचें ऐशी होती कुगती! १०९
विरहताप वा शमवायास्तव मजला हृदयीं धरिती
युवती, परि तनु तिच्यासहित मम दग्ध होउनी जाती. ११०
किंवा होता स्त्रीपुरुषांच्या प्रीतिकलहिं मम अंत,
येथें रानीं उगा न जन्मा मजला घालि अनंत. १११
फार कशाला? तुझ्याच हातीं जरि मी येउन पडतें,
कोमेजुन जातांच मला तूं फेंकुन दिधलें असतें! ११२
ह्मणशिल नाहीं, वचनें देशिल, घेशिल शंभर आणा!
अनुभव परि हा आजवरीं ये बहुधा सर्व फुलांनां! ११३
काय सुखाची व्याख्या करिशी सर्व जगा सामान्य,
दुःखस्थिति तुज माझी दिसते तीच मला परि मान्य. ११४
काय वाटतें तुला उपवनीं सफलच मम वय होतें,
भ्रांति सोड ही, जें जें दैवीं असेल होइल तें तें!" ११५
हासुन बोले कवी "तरी चल करील दैव हवें तें,
उगाच चिंता भलत्यासलत्या कां तव चित्त करीतें? ११६
अनुभव नाहीं तुला कशाचा, असंबद्ध तव वाणी,
खरें सांग, तुज वैराग्याची दीक्षा दिधली कोणीं? ११७
जगांत आह्मी सदा रहातों अमुचीं वचनें खोटीं,
एकाकी तूं पोर कालचें, ज्ञप्ति तुझी बहु मोठी! ११८
शुद्ध सुखाची आशा खोटी, न मिळे जनिं वा विजनीं,
फोल तुझे हे बोल, जा पहा अपुल्या गुरुला पुसुनी. ११९
तृषेवांचुनी जलही नाहीं, क्षुधेवांचुनी अन्न,
उष्म्यावांचुन चंदन नाहीं उपभोगार्ह कदा न! १२०

ध्वांतावांचुन सूर्याचाही प्रकाश विश्वीं नाहीं,
दुःखावांचुन नको सुखाची व्यर्थ कल्पना पाहीं. १२१
अनुरागाचा सुंदर तरुवर दुःखकर्दमीं रुझतो.
अश्रुजलाच्या सारणिमाजीं सदैव वाढत जातो. १२२
वनभूमीवर जगे न तो परि जनभूमीवर जगतो,
विभूतिनें निज ह्या धरणीचा स्वर्गच दुसरा करितो. १२३
छायेखालीं ह्याच्या बसतां जग हें सुखकर सारें,
दुःखद जे जे तुला वाटती ते ते सुखद पसारे! १२४
ह्या वृक्षाच्या शाखेमध्यें तुला निवेशित करितों,
चल ये पाहूं'' ह्मणून कवि तो हात पुढें पसरीतो. १२५
इतुक्यामध्यें घूत्काराला ऐकुन दचके चित्तीं,
तयास आलें कळुनी कोणीं भ्रंशविली सुमवृत्ती. १२६
जगन्मित्र रवि परि त्याचाही द्वेष्टा नीच उलूक,
दोषदृष्टिचा उभाच साक्षात् विश्वीं तो अतिरेक. १२७
तोच भेटला अजाण कुसुमा परम गुरू त्या कळलें,
अश्रु कवीच्या नेत्रांतोनी फुलाजवळ त्या गळले. १२८
त्या घूत्कारा ऐकुन सुमनें बळें फिरविली मान,
गेला कवि मानून जाहला हाच खरा अपमान. १२९
परि त्याचे ते गळले होते अश्रू भूमीवरतीं,
तेच जहाली पुष्पलता नी न जाणतां शोषीती. १३०
अश्रु न ते, परि कविच्या हृदयीं प्रेमनदी जी वाहे
पूर तियेचा बाहिर पडला त्याचें निर्मल जल हें! १३१
तें लतिकेच्या अंगीं भिनतां तीच्या रम्य फुलाच्या
पहिल्या वृत्ती रहातील हो कोठुनियां मग त्यांच्या! १३२

कविमय झालें चित्त लतेचें तीच्या त्या सुमनाचे,
मागें पुढतीं वरी खालतीं भासे कवीच नाचे! १३३

हें प्रेमाचें राज्य पाहुनी घूक पळोनी जाय,
जाणुन आतां नाहीं येथें अपुला कांहिं उपाय. १३४

परी दयित तो कोठें गेला ठाउक कुसुमा नाहीं,
जरी तयाची विश्वीं भरली सदैव मूर्ती पाहीं. १३५

प्रहर लोटला पुन्हां कवी तो फुलाजवळुनी गेला
न बोलतां तैसाच, भासला भारी मनिं रागेला. १३६

परंतु फुल तें तसेंच उठुनी त्याच्या हृदयीं शिरलें,
मेलें ह्मणती परि तें खोटें, कविहृदयीं तें रमलें! १३७

अजून आहे तें फुललेलें त्या रसिकाच्या हृदयीं,
जातिल दोघें परलोकाला अंतीं एकच समयीं! १३८



## कुसुम ३ रें.

# तारातरंग.

"Ye many twinkling stars, who yet do hold
Your brilliant places in the sable vault
Of night's dominions!— *
* * —To you I raise
My lowly orisons,"

—*Henry Kirke White.*

### स्रग्विणी.

[ चाल—अच्युतं केशवं रामनारायणम्. ]

माझिया लोचनांनों! पहा हो पहा
श्रीनिशादेविचा राष्ट्रविस्तार हा;
केवढा हा अवाढव्य भव्याऽकृति!
ईश्वराची किती ही अगम्या कृति!

कृष्णरात्रीचिया कृष्ण पीठावरी,
कृष्ण आकाश हें कृष्ण छत्रापरी,
त्यांत कोट्यावधी तारकांचे हिरे
लाविले, ज्यामधीं दिव्य तेज स्फुरे.

कृष्ण तें[1] जीतुकें, शुभ्र हे[2] तीतुके,
स्थूल तें जीतुकें सूक्ष्म हे तीतुके;
अंबरें तारका शोभती सुंदर,
तारकांहीं दिसे शोभिवंतांबर.

ज्यांमधीं शांतसा कांतिचा संग्रह
दीसताहे, असे हे अनेक ग्रह;
अन्य-तारावली-केंद्र ह्या तारका
स्वप्रकाशें कशा हो मनोहारिका!

चंड मार्तंडशा त्या प्रचंडा, तरी
भासती अल्पशा काजव्यांच्यापरी!
बाह्यरूपास पाहोनियां लोचनीं,
वस्तुचें वास्तव ज्ञान नोहे मनीं.

हे असंख्यातशा तारकावृंद हो!
काय हीं आमुचीं लोचनें अल्प हो!
वृंद हे तूमचे पाहतां पाहतां
होतसे त्यांजला भ्रांति कीं तत्वतां!

---

१ आकाशछत्र. २ तारकांचे हिरे.

नीच धूलींतले जंतु जे मानवी,
त्यांस कैशी कळे तूमची थोरवी?
ही असंख्यातता, ही अमर्यादता,
दिव्यता, भव्यता, नेणवे तत्वतां!

ज्ञान हें तूमचें व्हावया व्यक्तसें,
ज्ञानवंतापरी बुद्धि आह्मां नसे;
ती महा नीचशा तर्कटें गंजली,
क्षुद्र जाल्या असे, मंद तैशी भली.

नम्रभावें तुह्मां वंदुनी, प्रार्थुनी,
तूमच्या प्रेक्षणें नेत्र हे तर्पुनी,
योजितों कल्पना मी तिथें संप्रति,
दृष्टिचीही जिथें कुंठताहे गति!

उंच उंच स्थलीं, फार उंच स्थलीं,
मारुनी ती भरारी पहा चालली!
शैल तों लंघिले, वातही लंघिले,
तारकासंघही सर्व उल्लंघिले.

ये अतां ती तया पुण्यलोकाप्रति
तत्त्ववेत्ते परं-धाम ज्या बोलती;
बोलती ज्यास निर्वाण वा, सन्मुनी,
उन्मनी पावती ज्याचिया चिंतनीं.

निर्मिला हा जगद्-व्यूह ज्या नायकें
तेविं विश्वें असंख्यें अशीं मायिकें,
तो विराजे तिथें दिव्य सिंहासनीं
विश्वकर्मा समाधी महान् लावुनी.

सर्व तारांगणांतूनि देवांगना
दिव्य वीणांवरी बैसल्या गायना;
रम्य गंभीरसे तंतु ते वाजती,
भैरवीचे ध्वनी अंबरीं गुंगती.

आळवोनी अनंता जगत्-कारणा
वानिती अप्सरा त्या तयाच्या गुणां;
वाङ्मनातीत त्या निस्तुला, ईश्वरा,
पूर्ण वर्णू ह्मणे कोणती हो गिरा?

"गा विभो! आमुचा नाथ तूं एकला,
सर्वसामर्थ्यवान्, सर्वसाक्षी, भला,
तूंच सर्वोत्तमा! थोर सर्वांहुनी,
दीपलों वैभवातें तुझ्या पाहुनी!

गूढ लीला तुझी मूढशा बालकां
जाणवेना अह्मां गा! जगत्-चालका!
गोल एकैक हा अद्भुतांचा निधी,
ह्यापरी निर्मिले गोल कोट्यावधी!

काय ही कल्पना! काय कौशल्य हें!
काय विस्तार हा! काय गांभीर्य हें!
ह्याच तर्कांमधीं गर्क झाली मति!
हे अगम्या! असो तूजलागीं नति!"

ह्यापरी चालतां गान देवांगनीं
नाद विस्तारला तो दिगंतांतुनी;
जाय एका ग्रहाहूनि दूज्या ग्रहीं
ये रितीं संचरे तो ग्रहोपग्रहीं.

दूर-दूरस्थ नक्षत्र-तारांतुनी
नादसंयोग तो राहिला गुंगुनी;
शेवटीं व्यापला सर्व दिव्यांगणीं;
लीन तेणें जगत् श्रीजगज्जीवनीं!

नादसंयोग तो स्वर्गलोकांतला
माझिया कर्णरंध्रीं गमे पातला;
सेवुनीयां सुधातुल्य तन्माधुरी
अंतरात्मा अहो! नृत्य माझा करी!

ह्यापुढें लोक हा व्यर्थ निःसारसा
भासतो दग्ध चितानलानें जसा!
सौख्य होणार जें स्वर्गलोकीं मना,
होय त्याची इथें अल्पशी कल्पना.

मानवांचें जिणें, मानवश्रेष्ठता,
कःपदार्थापरी येथ झाली अतां!
ह्या प्रचंड-प्रभा-गोल-संख्येपुढें
सार्वभौमासही दैन्य ये रोकडें!

हे परंज्योति! हे सर्वसामर्थ्यवान्!
वस्तुमात्रांत जो तूं सदा दृश्यमान्,
आदिहेतूहि जो भीमकर्मास या,
ये प्रभो! त्या तुला काय माझी दया?

सर्पटे भूतलीं दीन जंतूच हा
एकदाही तया तूं दयाळा पहा!
गा, पहाशील का? कां न तूं पाहसी!
सार्थ संज्ञा तुला 'सर्वसाक्षी' अशी.

तूंत जें भूतवात्सल्य देवा! असे,
ह्या नभासारिखें तेंहि निःसीमसें,
जेविं निःसीमसें तेविं निःसंगसें,
राव कीं रंक हा भेद त्यातें नसे!

त्वत्कृपालेशही हे कृपासागरा!
स्वेच्छया तूंच देशील ह्या पामरा;
त्वत्प्रसाद-प्रभा लाभलीयावरी
दैववान् कीटही काय मौजा करी!

## शिखरिणी.

अहो! तत्वें सारीं असति किति हीं उन्नत तरी!
तयांसंगें जातां मन उडुनि उत्कर्षशिखरीं
अहंभावाचें तें घनपटल त्याचें वितळतें
द्युति ज्ञानार्काची मग सतत त्यातें उजळिते.

कळे नित्यानित्य त्वरित मद जाओनि विलया,
भयानें ईशाच्या मन धरितसे तें सुविनया,

नया उल्लंघाया कधिं नच धजे कीं, उपरमे[1]
रमेशाच्या पायीं, भवविभव त्यातें श्रम गमे.

वृथा संसारींच्या मृगसलिलशा सौख्यलहरी!
वृथा शृंगारांनीं तनु सजविणें ही वरिवरी!
वृथा सन्मानाचा प्रसर! सगळे संभ्रम वृथा!
महत्वाकांक्षाही क्षणिक इह लोकांतिल वृथा!

कळे हें सारेंही; तरि जडमती मी किति पहा!
रचाया काव्यातें जडित बसलों शब्दनिवहा;
सुखें निद्रा घेतां सकल जन, मी काय शिणतों!
अहा! विश्रांती जी हितकर, फुका तीस मुकतों!

कृती माझी सारी सरसरमणीया उतरुनी
मला संतोषानें वरिल कविकीर्ती बुधजनीं;
अशा आशा–पाशामधिं अडकुनी मी तडफडें,
यशःप्राप्ती?–तों ती विधिवश! घडे वा नहि घडे!

असे गंजीफांचे धडधडित वाडे वसवितां,
दंवाच्या बिंदूंचे नवलपरिचे हार करितां,
दिगंतीं धावोनी रजनिकर-चेंडू कवळितां,
मनातें देहातें घडति परिताप श्रम वृथा!

अनाद्यंता ईशा! बहु बहकतों मोहतिमिरीं!
मला सन्मार्गातें करुनि करुणानें झडकरी!
मिळे शांती जेणें क्षितिस असतां आमरण ती,
**परधामीं** नामी तव निकट अक्षय्य वसती.

---

१ शांति पावे. जसें 'उपरमे परमेश्वरगायनीं.'—वामन पंडित.

किती हो तृष्णा ह्या विफल मरणाधीन मनुजां!
किती दीर्घोद्योग, प्रबलतर आशा तदनुजा!
परी, सारीं मिथ्या! शिव शिव अहो, मोहमय तीं,
ठकाचीं कालाचीं अघटित भुतें कीं भुलविती! २४

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 225
ठाणे शाखा (स्थल प्र

## कुसुम ४ थें.

# प्रीतीचा वास.

[ एका किल्ल्याच्या वेशीजवळ चढणीवर उभा असलेला एक तरुण, कुलीन, पण गरीब गृहस्थ उंच खिडकींत उभ्या असलेल्या रूप-यौवन-संपन्न अशा आपल्या प्रीतिविषयक कुमारीप्रत ह्मणतो:—]

प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी!
उतर उतर! ये
प्रीति हवी तरी,
रुचति खालच्याचि तिला मोकळ्या, निळ्या दरी!

चंद्र एकलाच वरी,
चांदण्या किती तरी!
झुरति कोंपऱ्यांत दुरी,
प्रीति काय ही खरी?
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी!

पक्ष पक्ष भेट दे न,
येतो तैं रागवून!
पडति फिक्या वक्र बघुन,
भीति त्यां भरे उरीं!
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी!

राया, गुहा, झरे
प्रीतिचीं खरीं घरें!
अदृश्य येथ संचरे
देवि तृप्त अंतरीं!
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी!

नीरस ते वरि महाल,
सरस या दऱ्या विशाल!
रक्तें ते लाल लाल!
विमल या दऱ्या परी!
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी!

कारंजें कृत्रिम वरि,
वारिपात येथ परी
झोंकतो हिरे तुषारि!
प्रीतिवसति ही खरी!
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी!

वेश्यांचें गान वरी;
पक्षि गाति गोड स्वरीं,
त्या नादें घुमति दरी!
उतर उतर सुंदरी!
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी!

हार जडचि तेथ तुला,
बाहु सजिव आपुला
अर्पिन सप्रेम गळां!
अधिक काय गे! सरी?
प्रीति ना वसे कधींहि उंच त्या गडावरी!

उतर उतर! ये
प्रीति हवी तरी
रुचति खालच्याच तिला मोकळ्या निळ्या दरी! ४२

## कुसुम ५ वें.

# कराल[1] करवाल[2].

श्रीसत्यवान् ह्मणुनि एक महर्षि होता,
स्वाध्यायधर्मपर[3], सत्तम, वंद्य, होता[4];
तो आपुल्या सतत राहुनि आश्रमांत,
सेवूनि कंदफलमूल वसे वनांत. १

बाहेर सोडुनि निजाश्रम तो न गेला,
तो स्वाश्रमींच मुनिवर्य सदैव ठेला;
आकर्षिलें मन तदीय न भोगजातें[5],
ठावा न भोगपरिवार मुळीं तयातें. २

तोडोनि कंदफलमूल वनीं स्वहातें,
आणोनियां विमल निर्झरकोदकातें;
तो सत्यवान् करि निरन्तर शान्त वृत्ति[6],
तो पांघुरे मुनिजनोचित एक कृत्ति[7]. ३

वर्षें अनेक मुनिचीं वनिं याप्रकारें
गेलीं, न तद्धृदयिं लेशहि पाप थारे;
तो शान्तचित्त[8] शुचिशील[9] महर्षि राहे,
कामादिषड्रिपुविकाररुजा[10] न वाहे. ४

---

१ भयंकर. २ तरवार. ३ वेद आणि धर्माचरण ह्यांत निमग्न. ४ यज्ञ करणारा. ५ भोग्य पदार्थांचा समुदाय. ६ उदरनिर्वाह. ७ अजिन किंवा चामडें. ८ शांत आहे चित्त ज्याचें. ९ पवित्र आहे स्वभाव ज्याचा. १० रुजा=पीडा.

आरंभिलें मग तयें कठिना तपातें
इच्छा मनीं धरुनि सार्थ करूं स्वतातें;
रुद्धेंद्रियप्रसर[1] होउनि निग्रहानें[2]
केलें तयें तप; तदीय न धैर्य सानें. ५
येतां रविभ्रमवशेंहि[3] निदाघकाल[4],
सेवी हुताशनशिखा[5] मुनि तो कराल[6];
स्थापी कृशानु[7] खर[8] चार सभोंवतालीं,
घेई शिरीं परुष[9] उष्णगभस्तिमाली[10]. ६
वर्षर्तुच्या समयिं वृष्टिजलासि साहे
आच्छादन त्यजुनि भूमितलास राहे;
केले तयें जलदवृंद[11] सदा वितान[12]
मानील तो कवण निग्रह अल्पमानें[13]. ७
हेमन्त येइ ऋतु सूर्यगतिप्रसंगें,
मग्नें तदा मुनि करी सलिलीं स्वअंगें;
तो शैत्य वारितग संततशान्त साहे,
हाले जलांतुनि न तो, स्थिर तेथ राहे. ८
केलें तयें तप महोग्र सहस्र वर्षें,
लाजावले मुनि तदीयतपःप्रकर्षें[14];
ते बोलले तप न आचरिलें कधींही,
कोणीहि यापरि, अहो! स्थिरता किती ही! ९

---

१ नियन्त्रित केले आहेत इन्द्रियांचे व्यापार ज्यानें. २ करारीपणानें. ३ सूर्य फिरल्यानें. ४ उन्हाळा. ५ अग्नीच्या ज्वाला. ६ भयंकर. ७ अग्नि. ८ प्रखर, प्रदीप्त. ९ तीव्र. १० सूर्य. ११ मेघमण्डल. १२ छत. १३ लहान आहे मोजदाद ज्याची. १४ त्याच्या तपाच्या उत्कर्षानें किंवा अतिशयानें.

श्रीसत्यवत्तप महोग्र असें बघून
झाला दिवोऽधिपति मत्सरशील[1] दून[2];
साहे न दुष्टमति इन्द्र तपःप्रकर्षा,
पावे तपश्च्यवन[3] इन्द्र करोनि हर्षा. १०

मात्सर्यलुप्तसुमती[4] पुरुहूत[5] आला
श्रीसत्यवन्नियमभंग करावयाला;
त्यानें तदा धरियलें भटरूप रम्य,
तो जाहला मुनिसि ह्या कपटें अगम्य. ११

होता सुतीक्ष्ण करवाळ[6] तदीय हातीं,
देखोनि जो भय विकंपित हो अराती[7];
होता सुवर्णघटित त्सरुही[8] तयाचा,
चञ्चन्मणिद्युतिमनोहररूप[9] साचा. १२

श्रीसत्यवन्मुनिपुढें उभला बळारी,
शोभे उरःस्थल विशाल तदीय भारी;
पाहोनि त्यासि वदला मुनि आतिथेय[10],
"सांगें भटा! मजसि तावक नामधेय[11]; १३

तूं कोण, कोठुनि, कशास्तव, ह्या स्थलास
आलास? काय हृदयीं तव सांग आस?
झाले तुला असतिल श्रम फार वाटे,
येथील वाट विषमा बहु तींत कांटे." १४

---

१ मत्सरी आहे स्वभाव ज्याचा. २ पीडित. ३ तपोभङ्ग. ४ मत्सरी स्वभावामुळें लोपली आहे सद्बुद्धि ज्याची. ५ इंद्र. ६ तरवार. ७ शत्रु. ८ मूठ. ९ चमकणाऱ्या मण्यांच्या कांतीनें सुंदर आहे रूप ज्याचें असा त्सरू. १० पाहुण्यांचा सत्कार करण्यांत चांगला. ११ नांव.

हे प्रश्न ऐकुनि मुनीप्रति इन्द्र बोले,
ब्रह्मर्षि निष्कपट तें परिसोनि डोले;
"माझा सुवर्णनगरांत असे निवास,
आलों तुझ्या कुतुकचोदित दर्शनास. १५

सोडोनि मामक पुराप्रति येथ आलों,
त्वद्दर्शनेंकरुनि आज पवित्र झालों;
साधूसि पाहुनि अघें जळती समस्त,
होई क्षणांत भवदुःखततती निरस्त. १६

मी दुष्करें तव तपें परिसोनि आलों,
त्वद्दर्शनाविषयिं उत्सुक फार झालों;
इच्छी न कोण नर साधु पहावयातें,
यद्दर्शनें दुरित जात असे लयातें? १७

आशीर्वचें मज करीं परिपूत साधो!
तीर्थाटनोत्थ मज येथचि पुण्य साधो;
मीं त्वत्पदीं नमवितों शिर नम्रभावें,
आशीर्वचें मजासिं उद्धारिं आज, पावें." १८

ऐकोनि हें वच मुनी पदसन्नतातें
बोले असें मधुर भाषण त्या भटातें:—
"लोपो तुझें सकल पातक, सौख्य पाव,
गाजो तुझा क्षितितलीं सुभटा! प्रभाव." १९

आशी अशी मिळविल्यावरि त्या द्विजातें
बोले महेन्द्र कर जोडुनि या वचातें:—

---

१ कौतूहलानें प्रेरित होत्साता. २ तति=समुदाय. ३ नष्ट.

"साधूत्तमा! विनति मी करितों तुला, ते
मान्या असो; पुरविं अल्प मनोरथातें. २०

हा देख खड्ग कनकत्सरु रत्नविद्ध[१],
जो लाजवी अनल[२] कान्तिगुणें समिद्ध[३];
राहो तुझ्याजवळ हा मम खड्ग, मी हा
नेईन येउनि पुन्हां, मम हीच ईहा[४]. २१

निक्षेप हा मम तुझेजवळीं असावा,
आशाविभंजक न शब्द तुवां वदावा;
येईन शीघ्र परतोनि तवाश्रमातें,
निक्षेप दे मुनिवरा! मम खड्ग मातें. २२

कार्यार्थ येथुनि अदूर मुनीश्वरा! मी
जातों; फिरोनि तव येइन शीघ्र धामीं;
जेथें असे मुनिवरा! मज जावयाचें
तेथें नको मजसि खड्ग, न काम याचें." २३

स्वीकारिला द्रुत अशंकित मानसानें
निक्षेपरूप करवाल मुनीश्वरानें;
श्रीसत्यवन्मन पवित्र तया न माया
ठावी, तयें न गणिलें लवही अपाया. २४

ठेवोनि इंद्र करवाल निघोनि गेला,
त्या हेतिचा[५] मुनिवरें प्रतिपाल केला;
निक्षेप तो असुपरी गणिला तयानें,
तो ठेविला जवळिं संतत सावधानें. २५

---

१ रत्नजडित. २ अग्नि. ३ प्रदीप्त किंवा पेटलेला. ४ इच्छा. ५ हत्यार.

आणावयासि फलकंद वनासि जातां
ठेवी सदैव करवाल मुनींद्र हातां;
तो हा कधीं न करवाल विसंबला हो,
तद्रक्षणीं समजला मुनि थोर लाहो. २६

गेल्या अनेक शरदा किल ह्याप्रकारें,
नेला न खड्ग निज गौतमदारजारें[1];
नेईल खड्ग भट येउनि तो स्थला या,
आशा अशी मुनिमनांतिल जाय वायां. २७

छेदावया मग फलें मुनि खड्ग योजी,
त्याचा असा न उपयोग अकृत्य मोजी;
अल्पें श्रमें फलनिकृंतन[2] होइ जेव्हां,
ह्या हेतिनें, मुनिस संमद[3] होइ तेव्हां. २८

तेव्हां पुढें हळुहळू विपिनांत कंदें
खांडावया धरियली खलु बुद्धि मंदें;
ती हेति योजुनि अशी मुनि फार हर्षे,
तो तोषला स्वमनिं हेतिबलप्रकर्षें. २९

त्यानें पुढें प्रतिदिनीं हरिणीकलाप[4],
नाणोनियां करुण आर्त मनीं विलाप
संछेदिला कुलिशकर्कशमानसानें[5],
तें क्रौर्य कोण मज सांग ह्मणेल सानें! ३०

श्रीसत्यवन्मनिं अहो नुरली प्रशान्ति,
न ब्रह्मवर्चसभवा[6] उरली सुकान्ति;

---

१ इन्द्रानें. २ फलें तोडणें. ३ आनन्द. ४ हरिणींचा समूह. ५ वज्राप्रमाणें कठोर. ६ ब्राह्मणत्वाचें तेज.

त्याचें तपश्चरणकर्म अतीव्र झालें,
एकाग्रचिन्तनिं मनःस्थिरता न चाले. २१

स्वाध्याय तो विसरला, सरला न धर्म,
खङ्गोपयोगपटुताच ह्मणे स्वशर्म;
खङ्गास नित्य परिघर्षणजन्य धारा
देओनियां करि मृगांवरती प्रहारा. २२

देखोनि कान्ति असिची परिघर्षजन्य,
मानी स्वतासि मुनि तो अतिमात्र धन्य;
हा हन्त! हन्त! मुनिचें तप नष्ट झालें,
कीं हेति चालवुनि तन्मन फार धालें. २३

दीनां मृगांवरि करोनि अहो प्रहार
तोषे मुनी क्षितिसि पाडुनि त्यास फार;
एकेंच देखुनि हतां हरिणां प्रहारें
हर्षे अती, मनिं तदीय न हर्ष थारे! २४

श्रीसत्यवद्व्रतविभङ्ग दिवोऽधिपाला,
संतोषहर्षद असा अतिमात्र झाला;
त्याची तदा निजपदच्युतिभीति गेली,
भेरी तयें निजकरें बहु ताडियेली! २५

सान्निध्य नित्य घडतां असिचें गळाली
सद्बुद्धि, शांति नुरली, करुणा पळाली!
तो क्रूर हिंस्रपशुचेपरि वागला हो,
व्हावा कसा मग तयाप्रति पुण्यलाहो! २६

---

१ तरवारीचा उपयोग करण्याचें कौशल्यच. २ आपलें सुख. ३ इंद्राला. ४ नगारा.

एके दिनीं असि तयें मग ताडियेला
धेनूवरी, असुविनाश तिचाहि केला!
हा हन्त! त्याक्षणिंच दुष्टहि तो निमाला,
गेला तयाक्षणिंच दुर्मति नारकोला[1]. ३७

दुष्टासवें न सहवास जनें करावा,
दुःसंग न क्षणहि एक जनें धरावा;
हा बोध वामनसुतें[2] सकलां कराया
हें गुंफिलें कवन तच्छ्रम हो न वार्या. ३८

जें वस्तु दुष्ट करणारचि तें अपाय,
ठेवा न तें जवळि, सौख्यद हा उपाय;
दुर्वस्तुसंग्रह करोनि फसों नका रे!
मद्यें अफू वितरिती असुखें अपारें. ३९

दिधला 'करालकरवाल' जनां
वितरो मुदा बहु तदीय मनां;
मजला उमातनु[3]भवासि शम,
वितरो असाचि मनिं हेतु मम. ४०

---

१ नरकाला. २ वामन हें विद्याधर कवीच्या तीर्थरूपाचें नांव.
३ उमा हें विद्याधर कवीच्या मातुःश्रीचें नांव.

## कुसुम ६ वें.

# कृष्णाकुमारी.

[ चाल–चंद्रकांत राजाची राणी. ]

कळी उमलली जों न पावली पूर्ण विकासाला,
अदय कराचा तोंच तिजवरी पडला कीं घाला!
सुनील गगनीं चमकूं लागे सुंदर इंदुकला,
तोंच तिचा निर्घृण राहूनें धरिला हाय! गळा!
भीम नृपाला प्रियकर बाला कृष्णा वेल्हाळा,
नडली, पडली बली अकालीं, त्या योगें, काळा!
**स्वार्थ संसृती, लोभपरायण जगताची रीती,**
**उठे सुतेवर पिता हितास्तव, विसरे नयनीती !** ८

उपवर झाली भीमकबाळी रूपवती कृष्णा,
तत्प्राप्तीस्तव सहज लागली भूपवरां तृष्णा;
जयपुरराजा ह्मणे गुणवती व्हावी मम भाजा,
जोधपूरचा भूप ह्मणे तो भाग असे माझा!
शिंद्याच्या जोरावर चढला मारवाडवाला,
वांच्छी व्हावी प्राप्त आपणा कृष्णेची माला;
जयपुरची मागणी तयानें धाकें परतविली,
राजस्थानीं वैराग्नीची ज्वाला भडकविली;
कृष्णेसाठीं सज्ज जाहले खड्गाचे हात,
घोर युद्ध माजलें, वाहले रक्ताचे पाट! १८

अमीर नामा पठाण घातक, नीच, अविश्वासी,
उदेपुराधिप मानासाठीं ये भीमापाशीं;

वदे "हितास्तव करा स्वदुहिता अर्पण मानातें,
अपकारक होईल जोडिलें अन्याशीं नातें;
अथवा हें खंडूनच टाका मूळ अनर्थाचें,
कां कारण होतां पाडाया बली सहस्रांचे?"
विचार पडला, कसा पोटचा गोळा तोडावा?
चुकवावें वा काय उपायें शत्रूंच्या घावा?
चालक, मंत्री अजित नृपाचा तोच मार्ग दावी,
"समयींच" ह्मणे "ही अग्नीची ज्योत मालवावी!" २८

आप्त जवळचा दौलत त्यावर ये ती कामगिरी,
कोसळून आकाश गमे त्या पडलें काय शिरीं!
"धिक्कार असो!" वदे "जीविता तुमच्या धिक्कार!
व्यर्थ जन्म घेऊन जाहलां धरणीला भार!
छत्र शिरीं मिरवितां, ह्मणवितां स्वता लोकपाळ!
पोर एक पोटची तिचाहि न करवे सांभाळ!
हाच काय पुरुषार्थ! कुलाचा हाच काय मान?
पुरुष सजावा कीं अबलेची कापाया मान!
रजपूतांचे छावे आह्मी अबलांचे साथी
वागवितों तलवार कटीला नित्य तयांसाठीं!
वदा कोण, त्या मृणालिनीच्या जीवावर उठला?
तद्रक्ताचा तिच्या कपाळीं लावित खास टिळा!
पडेल जेथें मृगनयनेचा अश्रुबिंदु एक,
अरिरुधिरानें त्या स्थानावर लिहूं सूड-लेख!
नको बुद्धि ती, नका अमंगल वच तें उच्चारूं,
धीर न सोडा; धर्म आपला रणीं मरूं-मारूं!" ४४

बोध खलास न रुचे, अहिमुखीं दुग्ध होय गरल,
श्वानपुच्छ नलिकेंत घातलें होईना सरल!
दौलत थिजला; परि न खलांचा दुष्ट यत्न विझला;
जवान दुसरा ती नव कलिका तोडाया सजला!
करूनियां निर्धार मनाचा, धरून तलवार,
गेला कृष्णेजवळ नीच तो करावया वार!
करीत होती हार फुलांचा जाईच्या रमणी,
जणों करी स्वकरें तरुणांचीं हृदयें बद्ध गुणीं!
हिमधवलांगी धवलचंद्रिकाहृदया बाला ती,
धवल फुलें तीं धवल करानें धवल गुणीं गांठी!
कृष्ण हृदय धवलतेजवळ तें झालें धवल पळीं,
नवल न धवलच बिंब शशीचें विलसे नील जलीं!
तिच्या दिव्य तेजानें दिपला, भरला कंप करीं,
उगारलेलें शस्त्र तयाचें गळलें भूमिवरी!
टिकलें पुण्य–प्रभावापुढें नाहीं पळ दुरित,
भग्नमनोरथ परत दुरात्मा गेला थरथरत! ६०

गळून पडलें शस्त्र पुढें तें–निशाण मरणाचें!
धरून जें स्वकरीं भूमिवरि स्वैर मरण नाचे!
परि नाहीं ती धैर्यदेवता तिळभर डगमगली,
मधु स्मिताचीं खळीं कपोलीं उलट तिच्या पडलीं!
परि मातेनें तिच्या मांडिला एकच आकांत,
मातृहृदय तें! करील कैसा सहन सुताघात!
पिटी उरःस्थल, कुंतल तोडी, कर माथां हाणी,
धाय मोकलुनि रडे, धरेला अश्रूंनीं न्हाणी. ६८

पाषाणालाही शोकानें त्या पाझर फुटता,
परि न तयानें वळले खळ ते, त्यजी न विष कटुता!

शस्त्र न चाले ह्मणुनि विषानें भरलेली वाटी
आणून दिली जनकाज्ञेनें कृष्णेच्या हातीं!
स्मित वदनानें करीं विषाचा धरून तो प्याला,
पदरें नयन पुशी मातेचे, वदे वीरबाला:–
"कां करिसी हा शोक? आणिसी कां नयनीं पाणी?
कवण वांचला सांग, भूवरी आजवरी प्राणी!
मृत्यु सखा सोयरा जिवाचा असे सदा साथी,
मृत्युबलानें तुटे भवाची दु:खाची गांठी!
वाट जिवाला चिर सौख्याची मृत्यु मात्र दावी,
वद, मग आली मरणाची का संधि घालवावी?
जन्म जयानें दिला तोच या जीवाचा स्वामी,
भाग्यवंत ती, पडे संकटीं जनकाच्या कामीं!
धिग् जीवित! ज्याकरितां पडती बली असंख्यांचे,
मरण यशाचें, जर त्यायोगें देश-धर्म वांचे!" ८४

देऊन असा धीर, विषाचा घेई ती घोंट,
मोहमूढ मातेस नावरे अश्रूचा लोट!
एकदोनदा घोंट विषाचा नाहीं तिस पचला,
दुष्टांनीं यास्तव नाशाचा बेत नवा रचिला!
हाय! कुसुंबा प्याया धरिला पुढें तिच्या ओठीं,
मालविली यापरी खलांनीं ती रत्नज्योती! ९०

केला, अनुमोदिला जयांनीं कृष्णेचा अंत,
त्यां शासाया चुकला नाहीं न्यायी भगवंत!
जसें करावें, तसें भरावें; बीज तसे दाणे!
'विनायका'ला करी बोध हा कृष्णेचें गाणें. ९४

## कुसुम ७ वें.

# विदुलापुत्रानुशासन.

ज्यांतून हें विविध विश्व असे उदेलें,
ज्यानें निबंधन तदीय सुरेख केलें;
तें मूळबीज, परमाव्यय, मंगलादि,
मी संस्मरोन दुरवीं निजमानसाधि. १

वाग्देवते! तव रसाल पदाब्ज कान्त
सेवी मदीय हृदयालि मुदें नितान्त;
हा लाभुंदे तव कृपेस जसा मयूर,
का व्यंग पुत्र जननी ढकलील दूर? २

होता नृपाल गुणमण्डित '**दान्त**' नामा,
सद्वृत्त, लोकहितसक्त, प्रशस्तधामा;
नांदे पुरींत निज निर्जितशत्रुवर्ग,
कैलासशैलशिखरोपरि काय भर्ग! ३

लक्ष्मी तदीय विलसे वितरून दानें,
व्हावें कशा जल, जरी न दिलें नदानें?
सत्ता शुभंकर असे विनयें, नयें ती,
ऐशा नृपास शिवण्यास भयें न येती. ४

राज्ञी गुणाढ्य '**विदुला**' अभिधान तीस,
रूपें करी तिस रमा बहुधा नतीस;
सुक्षत्रिया विमल मूसचि निश्चयाची,
ती कां रुचेल न सखी गिरिजेस साची? ५

झालें तयांस शुचिलक्षण पुत्ररत्न,
संगोपिलें गुरुजनीं करुनी प्रयत्न;
दैवज्ञमंडलमतें नृप पूर्णकाम
दे त्यास '**संजय**' असें शुभधाम नाम. ६

काळें नृपास जडला दृढ राजयक्ष्मा,
तो काळदूतच; वरी सुत **संजय** क्ष्मा;
स्वक्षात्रधर्म **विदुला** तनयास सांगे,
लोकानुरंजन करी श्रमुनी निजांगें. ७

तों एकदा समरमानस **सिंधुराज**
येई जसा धरुनि सिंधुरराज माज;
जाळूनपोळुनि करी खल देश फस्त,
दण्डार्थ **संजय** निघे सबळ प्रशस्त. ८

युद्धांगणीं तडक **संजय** ये ससेन,
बोले सगर्व "कधिं शत्रुदळीं धसेन!"
पाहून **सिंधुपति**चा परि सैन्यसिंधू,
याच्या ठरे न हृदयांतिल रक्तबिंदु! ९

दाखवी तडफ **सिंधुराज** तो,
संगरांत बळसिंधु साजतो;
त्यास **संजय** विलोकितां पळे,
तो शृगाल, रिपुकाय सांपळे! १०

सोडुनी सभय संगरक्षिति,
काय वीरवर अंग रक्षिती?
त्या परंतु **विदुला**तनूभवें
त्यागिलीं समरकीर्तिवैभवें! ११

निजात्मजोत्साह असा जिराला,
दे पाठ तो हंत! रणाजिराला;
ही आयकोनी विषतुल्य वार्ता,
झाली मृगीशी **विदुला** दवार्ता. १२

कशी अशी निंद्य कृती नराशीं
ती क्षत्रिया साहिल मानराशि ?
देई न संताप बसंत तीतें,
गणी महारोगचि संततीतें ! १३
पाहोनि नष्टा कुलसद्यशोभा,
लज्जाविलुप्ताननभव्यशोभा;
क्षोभातुरा कांति निरस्तवेत्रा,
ती जाहली कोपविरक्तनेत्रा. १४
संत्रासली ती विषवृत्तपानें,
दग्धाधरा निःश्वसितातपानें;
धिक्कारिते आत्मसुता प्रकोपें,
भेदी तया निष्ठुर शब्दरोपें. १५
घडे यदा तीक्ष्ण अयःप्रहार,
तेजःकणातें वमणार गार;
ती चालवी जाज्वल शब्दटंक,
की पुत्र दावो यश निष्कलंक. १६
"स्वपूर्वजांचे गुण आठवीं रे !
न दाविणें शत्रुस पाठ वीरें !
न पुत्र तूं, मी तव माय नाहीं !
कुलघ्न होसी रडगायनांहीं ! १७
झालास तूं स्वान्वयकीर्तिहर्ता !
शत्रुप्रति श्रीपददानकर्ता !
मी मानितें तो नरवीर मेला !
जो शत्रुहस्तीं बरवी रमेला. १८
न पुत्र तूं, केवळ मांसगोळा !
मज्जास्थिच्या मात्र वहासि खोळा !
रणांत मृत्यू मज मान्य होय,
न, सोडसी जें स्वयशास, तोय. १९
या मूर्तिमान् प्राक्तनपापकोटीं
रूपें तुझ्या जन्मति काय पोटीं !
न जन्मदात्रीसच, पूर्वजांला,
सर्वां, कृतीनें तव पात झाला ! २०
वा ! संजया ! कौतुकपूर्व, देख !
म्यां ठेविलें नाम तुझें सुरेख !
अजागळा ! तूं परि अप्रबुद्ध
आचार हा दाविसि तद्विरुद्ध ! २१
विमन्यु, निस्तेज, अवीर्य, षंढ,
अशांस का मान मिळे अखंड ?
हूं, ऊठ, झाडीं भ्रममोह दैन्य,
गर्जे हरीसा समरीं ससैन्य. २२
मागें न ये, दे पुढतींच पाय,
क्षत्रांस हा एक यशा उपाय;
रणांतला मृत्युहि फार गोड,
अकीर्तिला भीरुपणें न जोड. २३
क्षात्रत्व, भीरुत्व, दिसे विजोड,
स्त्रैणत्वदोषास समूळ खोड;
कलंक साजो द्विजराजचंद्रा,
न क्षत्रिया, मानधना, अतंद्रा. २४
तृणापरी प्राण रणांत लेख,
यशास वा देवपुरास देख !
नाहींतरी, लोळति नीच कीट,
त्यांतील तूं एक खरा अवीट ! २५
बा ! ऊठ ! ऊठ! भ्रम दूर सार,
तूं होई लोहोपम शूरसार;
वृत्ति त्यजीं बांधवशोकदा ते,
दे शत्रुगर्वावर ओखदातें. २६

ओढा भरे लाहुनि अल्प वारी,
कुधान्यंही मूषक तोषकारी;
अल्पांत तोषे नृप एक मूढ,
ही आठवीं क्षत्रियनीति गूढ. २७

जा, पाड, जा, शत्रुभुजंगदंत,
वा पाव वीरोचित तूं सदंत;
परंतु दावीं सुपराक्रमातें,
सेवीं न या क्षुद्र नरक्रमातें! २८

जो जन्मला सिंहकुळांत बाळ,
व्हावा न तो भ्याड जसा शृगाळ!
हाणूनि त्यानें मददंतिकुंभीं
पंजा करावा अपुला कुसुंबी! २९

निघें, निघें येथुनि तीव्र रागें,
सरों नको तूं पदमात्र मागें;
जा, घूस युद्धीं जणुं मुक्तवाण,
दे हें असें आइस दिव्य वाण! ३०

नभीं ससाणा धरि रंगणातें,
टपोनि पाही रिपुच्या गणातें,
तद्रंध्र शोधी, करि विक्रमातें,
होतो न तो वश्य भयभ्रमातें. ३१

न वीर्यवन्ही समरें विझावा,
घृतें तसा तो अति पाजळावा;
हा दूरवीं अंमल आळसाचा,
न प्रेत हो, हो नृपबाळ साचा! ३२

आलातसा पाजळवोन ओज
जरी विझालास, करीन चोज;
तुषाग्निसा केवळ धूमराशी
नको, नको हा धरणें उराशीं! ३३

सहिष्णुता भूषण रासभाला,
न संगरीं ती परि राजबाला!
करोनि खड्गें घन खण्खणाट,
चोखाळ जा मुक्तियशांस वाट. ३४

त्वां सांडिला क्षत्रिययुद्धयज्ञ,
छी! संजया! काय असा नयज्ञ?
कां दाविसी हें मज कृष्ण तोंड?
हाणूनि घ्यावी स्वशिरांत धोंड! ३५

ज्याची जळे हिंमत सर्व खाक,
पोटार्थि तो केवळ नीच काक!
न ज्या नृपातें स्तवितात लोक,
न स्त्री, न तो पूरुष, हें विलोक. ३६

जो ज्ञानशौर्यांस न गाढ वीतो,
संख्याच तो केवळ वाढवीतो!
होतां नृपाचा सुयशीं वियोग,
न क्षत्र तो, घातक मातृरोग! ३७

रे! भैक्ष्यवृत्ती अनुरूप का ही?
दावीं स्फुट स्वोचित रूप कांहीं;
तुला अशा पाहुनि दुर्बळाला
संतोष होतो अरिच्या बळाला! ३८

जो क्षुद्र लाभास महत्व देता,
जीवंत राही रिपु कीर्ति नेतां,
तो हीन राजा स्वजनीं वधावा!
तेज त्यजी, कां तरि सूर्य व्हावा? ३९

न लांकडी निर्बळ बाहुला हो,
लक्ष्मीप्रसादा तव बाहु लाहो!
होतोस का मांडलिकत्वकामी,
बांधूं नको तूं अपणा लगामीं. ४०

लक्ष्मी न भाळे कधिं मेषपात्रा,
हा कंप कां त्वद्दलितांगगात्रां ?
हो धीट, कालाहिपरी फणाणें,
धावें न वेड्या ! सरड्याप्रमाणें. ४१

लक्ष्मी बळें साहसिवीर खेंची,
बुळा खुळा अश्मकणांस वेंची !
जेव्हां हणावे निधडे तडाखे,
तेव्हांच हें विश्व समस्त धाके. ४२

जी त्वत्प्रजा घेइ न शाप तीचा,
ठेवी न भू मान अशा पतीचा;
न स्वप्रजांहीं जरि तूज गावें,
किमर्थ लोकीं तरि तूं जगावें?" ४३

जननी वचनाशुगीं क्षित
विनवी **संजय** साश्रु वीक्षितः—
"रिपुनिर्जित हीन दुर्बला
न असें निष्ठुर तूं वदें मला. ४४

सहितां हिमकाल तीव्रता,
तरु घेतात जणूं यतीव्रता !
दलसंघ समस्त तो गळे,
दिसताती नयनांस ओंगळे. ४५

परि ये अनुकूलता यदा,
मिळवीती गतपर्णसंपदा;
नव, कोमल, रम्य पल्लवीं
नयना रंजवितात माधवीं. ४६

शिशिरी तरु भासतो यती,
ह्मणुनी चालविणें न कोयती;
दलहेतु वसंत जाणुनी,
तरु टाकीं सहसा न खाणुनी. ४७

दलहीनहि तो जरी तगे,
नवलक्ष्मी तरि दे वसंत गे !
समया विपरीत पाहुनी,
असु रक्षीं, परिभूति साहुनी. ४८

करितां हृदयें दुरुद्धतें
निजपूर्णक्षयहेतु युद्ध तें,
मज लाभ न लेशही दिसे,
उलटें तें असुघातकी पिसें ! ४९

यश येइल काय ? मावली !
जरि ती शोणितासिंधु धावली;
उलटा फिरलाच काळ कीं ?
न उगीं ध्या सडकून टाळकीं. ५०

भिडुनी, लढुनी महाहवीं,
तनु मी रक्तनदींत वाहवीं,
तरि काय तुला सुताविणें
वद, होईल सुखाढ्य हें जिणें ? ५१

जरि आज तगेल ही कुडी,
तरि मारीन पुढील मी उडी;
जरि ही जळली समिद्वें,
जळलीं सर्व भविष्यवैभवें ! ५२

अजि मांडलिकत्व मी वरीं,
परि दृष्टी चिर वैभवावरी;
अनुकूल परिस्थिती बरी
दिसतां, मी अपणास सांवरीं. ५३

मजवांचुनि वांचुनी तुतें
क्षितिलाभीं दिसती न हेतु तें;
कुयशें खिजसी, महाशये !
न कशी तूं परि या कुलक्षयें ? ५४

असुनी तव मी कुलांकुर !
जननी ! भाससि काय निष्ठुर !
समरांत मरावया मुला
दवडोनी क्षय लाविशी कुला ! ५५

बळवे खळ वेगवान् मर्दे,
मज धाडीं न रणास जन्मदे !
अजि मांडलिकत्व हें बरें,
फिरला काळ करील घाबरें ! ५६

उजवीन कुळा कधीं तरी,
जगलों मी जननी ! अजी जरी;
परि होइन मी यमा वश,
तरि कैचें कुळ? कोठलें यश?" ५७

अशी ऐकुनी पुत्रवाणी स्वकर्णें,
दिसे क्षत्रिया निष्प्रभा देहवर्णें;
जणों शब्दरूपी कटू काळकूट
शिरे काळजाची करायास फूट! ५८

सुतस्त्रैणता पाहुनी ती चपापे,
खिळोनी जणों टाकिली शब्दचापें!
मुहूर्तावधी बैसली स्तब्ध हीन,
अतिक्षोभवेगें फुटे शब्दही न. ५९

असा काय यावा तिच्या रोग पोटीं?
हिरा मानिला, तो ठरे गारगोटी!
नव्हे ही सुताची, प्रसूची कसोटी !
कुवेळा तिला खेदकूपांत लोटी. ६०

परी अल्पकालें करी मोह दूर,
पुन्हा क्षोभली क्षत्रिया धीर शूर;
प्रकोपोद्गमें तो स्फुरे भ्रूविभंग,
गमे अर्चि ती, पुत्र हो का पतंग! ६१

मुखीं क्रोधजश्यामिका घे प्रकर्षा,
दिसे पातली काय ही मूर्त वर्षा !
दणाणे, चकाके, द्रुत श्वास चाले,
जणों चंडिका ती स्वरूपें करालें! ६२

करूनियां उन्नत तर्जनीतें
ह्मणे स्वपुत्राप्रति गर्जुनी तेः—
"गचाळ कां बोलसि बोल हे बा!
न पाजळावा अपकीर्तिटेंभा ! ६३

रणीं प्रवेशून वन प्रचंडीं
पळूनि आलास भयार्त लंडी!
करोनि पांडित्य घरांतलें, का
होशील तूं क्षत्रियनाथ? लेंका! ६४

भीरूस बुद्धी, असि बुद्धिमंदा,
न योग्य जैसें जल दुष्टकंदा;
भीरुत्व नामी पहिला वदे हा,
छेदी दुजा साधुस वा स्वदेहा! ६५

न मारितां एकहि खड्गघाय,
रणांतुनी हालविलास पाय;
हा मासला का तव धोरणाचा?
भावि क्रमा हा सुचवील साचा! ६६

रणास हे उत्सुक सर्व लोक,
भीरुत्व तूझें करि त्यां सशोक;
यत्नाविणें कां वदसी नहाक?
कीं हा असे दुर्विधिदुर्विपाक. ६७

न एकदाही लढलास नेटें,
तुझा न कोपानल हंत! पेटे;
उगा कशा बोलसि दैवदोष?
निमीलिताक्षा दिनहि प्रदोष! ६८

भय त्यजूनी, कर तूं विचार,
हें आयकें सांगति काय चार;
रे ! सिंधुराजा चढुनी यशानें
झाला सुरामत्तनराप्रमाणें. ६९

सैन्यांत त्याच्या न मुळींच बंध,
बेघोष सारे करितात फंद;
न सैन्य हें बा ! विषवल्लिकंद,
होईं पतीलाच यमप्रबंध ! ७०

परंतु तूंची पडलास भ्याड,
देसी विपत्तीस वळें विऱ्हाड;
करीसि हा आणिक बुद्धिवाद,
न का त्रपाकारक हा प्रमाद? ७१

या दैववादांत पडूं नकोच,
खेंची यशा, ठेवुनि वीर पोंच;
न वीर, जो कालवश, स्मरें तूं,
स्वयेंचि सुक्षत्रिय कालहेतू. ७२

वैरी करी फस्त समस्त देश,
वेंगाडशी तोंडचि तूं पदेश!
जा, माग, जा, भीक पिटोनि झांज,
मी मानितें रे ! अपणास वांझ ! ७३

ज्याला प्रतिष्ठा न, न कीर्तिमान,
न धाडसी शौर्य, न कृत्यभान,
नाहींच वंशांकुर तो कुमार,
तो सयशःस्वस्तरुचा कुठार! ७४

रे ! संजया ! आठव तो सुतात,
न यद्गुणांचा लवही सुतांत !
वसुंधरेच्या उदरांत गार,
तसाच तूं क्षत्रकुलीं भिकार! ७५

हें दैववादित्व न कांहिं खास,
करीतसों आपण आत्मकृत्य;
जो दीर्घसूत्रत्व वरील मूढ,
तो होय आपन्नरकीं निगूढ. ७६

पूरीं लव्हाळे तगतात भ्याड,
महातरू मोडति धाडधाड!
ह्मणून मंदा ! न वरा लव्हाळा,
न मान मानाधिक राजबाळा. ७७

लवे, जगे जें तृण, तें न वृक्ष !
न क्षत्र तो, जो भुजवीर्यरूक्ष;
प्रयत्न वीर्याविण दैव पंगू,
यशोनुबंधास नको विभंगूं. ७८

तुझा असे थोर नृपाधिकार,
त्वदाश्रयानें बहु राहणार;
झालास तूं बाष्कळ आज कोल्हें,
स्वलोकनेत्रोर करीसि ओलें ! ७९

स्ववंशकीर्तिध्वजहानि घाला
घालावया शत्रु, पहा, निघाला;
नृपावरी कीर्ति वितान होते,
तीवीण दे आयु फला न हो! तें.८०

तातें तुझ्या रक्षुनि ठेविला हा
अपार आहे धनकोष, पाहा;
यशोर्थ, सैन्यार्थ तयास वेंच,
बा उकली हा परि दुष्ट पेंच. ८१

जा, मेळवीं सत्वर तूं प्रधान,
ससैन्य रक्षीं स्वयशोनिधान.
कर्तृत्वहानीच समस्त हानी
ध्यानीं धरीं हें, यश जीव मानीं. ८२

जीवंत जों, तों न वरीं ढिलाई,
रिपूंस दे तोंड, करीं लढाई;
सिद्ध स्वसेना कर याच पायीं,
प्रख्यात होशील गडी शिपाई ! ८३

'मरेन मी' हें न मनांत आणीं,
उगारिला नित्यच मृत्युपाणी;
रणीं तसा मृत्यु गृहींहि आहे,
न 'हा' ह्मणोनी अवमान साहें. ८४

यज्ञांत अग्नींत पडेल अन्न,
करील तेंच त्रिदश प्रसन्न !
मरे रणीं घेउनि आयुधाला,
तो क्षत्र मानी सफलायु धाला !" ८५

अशी मातृवाणी लसत्तेज खाणी,
जणों टोंचली त्या सुताला पराणी !
घडे तत्क्षणीं गुप्तवीर्यप्रबोध,
स्फुरे वायुसंक्षुब्ध जैसा पयोद. ८६

जसा सूर्यकांत प्रचंडांशु तप्त,
तसा बाल उद्गारितो तेज सुप्त;
भुज प्रस्फुरे, नेत्र अंगार साच,
भयें पावते काय भंगा रसाच ? ८७

नवें रक्त दिव्याभ अंगांत वाहे,
सळे श्वास, कोपाग्निचे काय आहे ?
उडे चेतली रुंद छाती धडाडा,
करारा तशा चावती गाढ दाढा ? ८८

ज्वलत्पर्वताचा घडे स्फोट काय,
असा संजयाचा उसाळेच काय;
न बोलेन, तो वंदुनी मातृपाय,
हयारूढ तेथून सावेश जाय. ८९

अशा आपुल्या दिव्यवाणीप्रभावीं
मनीं राजमाता मुद क्षिप्र भावी;
वघोनी रणोत्कंठ तो सिंहछावा,
तशा वीरसूला न का मोद व्हावा? ९०

खडाडून झाला भला वीर जागा,
निरुत्साहभावा भलावी रजा गा ?
नवीनोद्गतौजोज्वलन्मुद्र साचा
गमे शुद्ध देह द्वितीया रसाचा ! ९१

प्रधानासवें तो करी गुप्तमंत्र,
पिटी दंड ते व्हावयास स्वतंत्र;
स्फुरे अंतरीं क्षोभली मातृमुद्रा,
उगे राहवी ती न तेजःसमुद्रा. ९२

नमी शंभु भोळा, करी सैन्य गोळा,
उडोनी धुरोळा खुपे देवडोळां !
असे ते निघाले करायास घाले,
धरापृष्ठ खालें भराक्रांत हाले ! ९३

जयश्रीकृपामत्त तो सिंधुनाथ,
नसे सावधानत्व त्याच्या दळांत;
करीती सदा पान मद्यासवाचें,
विटाळीति अश्लील शब्दें स्ववाचे. ९४

जिला भान नाहीं स्वतांच्या तनूचें,
तिचें स्वामिनिष्ठत्व कैचें चमूचें ?
अशांना जयश्री कशी ती पचेल,
जशी दानवांनां सुधाकल्पवेल. ९५

उडे रंग रात्रीं निवेशीं अमूप,
तिथें वैसती खुद्द खासे चमूप !
न भीती, न रीती, न नीती तयांत,
न ते जाणती कीं समीपीं कृतांत. ९६

अकस्मात् कडाडे परी वीज काय !
घडे रंग बेरंग लागून घाय;
गदा, चक्र, भल्ली, असि, प्रास, बाण
सुरापांस त्या हाणिती हाण हाण! ९७

उठे चंड उद्दंड तों वीरघोष,
उडे तत्क्षणीं मंडलींतील तोष;
दिसे मद्यप्यांची स्थिती भीकरा जी,
महाहीपुढें तीच व्हे भेकराजी. ९८

पहा, **संजय** प्राप्त झाला ससेन,
म्हणूं सिंह तो, मूढ हे कां ससे न?
शरौघास वर्षी जसा मेघ वारी,
सुरापांस तो जेविं दैत्यां मवारी. ९९

न ती थारवे **सिंधुराजा** स्वसेना,
कसें फूटल्या आवरावें नदेना?
दशाशांस त्यां फांकवी बालवीर,
सुमांच्या परागांस जैसा समीर. १००

दशाशांस ते वालुकेचे रवेची,
कसा त्याप्रती कोणता वीर वेंची?
हरी संजय क्षुब्धऐंद्र स्वचापीं,
रवीसा तपे प्रौढचंड प्रतापी. १०१

जयश्री कृपाचिन्ह सत्कीर्तिमाळा,
तदा घालुनी, त्यावरी राजबाळा;
करी उत्सवें तो पुरींत प्रवेश,
प्रजा हर्षली पाहुनी तो नरेश. १०२

ध्वजा, तोरणें, भव्यरंगी पताका,
पुरस्थ प्रजा हर्षमूर्तीच ह्या का?
स्त्रिया आदरप्रेमपूर्णेक्षणांनी
नृपीं वर्षल्या पुष्पलाजाकणांनी. १०३

किती भाट गाती यशें सुस्वरांनीं,
दिलीं मंगलाशीर्वचें भूसुरांनीं;
अशा वैभवीं पातला मंदिराशीं,
तिथें भेटण्या माय ये इंदिराशी! १०४

त्वरें भूप लागे प्रसूच्या पदासीं,
म्हणे 'त्वत्प्रसादें रमा चापदासी.'
तदा वर्षुनी हर्षबाष्पां अनेक
करी वाटतें माय पुत्राभिषेक ! १०५

अहा ! काय तो वर्णु भव्य प्रसंग,
क्रमी अंतरिक्षास कैसा पतंग?
'अहो! धन्य ती माय! तो पुत्र धन्य!'
अहंमन्यता दाविती शब्द अन्य! १०६

## कुसुम ८ वें.

### स्वप्न.

[ चाल—नृपममता रामावरती. ]

ताऱ्यांविण रजनी काळी
भयदायक होती झाली—सुन्दरी !
जोरानें झंझावात
वाहत तो आकाशांत—सुन्दरी !
घुबडांचाही घूत्कार
श्रवणीं ये वारंवार—सुन्दरी !
दुश्चिन्हें मजला भारी
भिवविती यापरी सारीं—सुन्दरी !
कल्पना दुष्ट बहु, मना
तीव्र यातना
हाय ! त्या काळीं
देती मज वेळोवेळीं—सुन्दरी !

[ २ ]

क्षुब्धता नभीं ती जैशी
हृदयींही वागे तैशी—सुन्दरी !
कुविचारसागरा मग ती
जोरानें येई भरती—सुन्दरी !
शान्तिस्तव पडलों शयनीं
पाहिलें स्वप्न तों नयनीं—सुन्दरी !
स्वप्नांत दूर देशांत
असुनि मी त्यांत
हुडहुडी भरली,
ज्वर भरे मला त्या कालीं—सुन्दरी !

[ ३ ]

काखेंत गांठही आली
ग्रन्थिज्वर घाला घाली–सुन्दरी !
पाहुनी स्थिती मम ऐशी
सुहृद्गण येइ मजपाशीं–सुन्दरी !
"व्हा दूर, जवळ नच यावें,
इतुकें परि कार्य करावें–सत्वरी.
सुन्दरी
हृदयमन्दिरीं
वास जी करी
तिला मजजवळी
आणवा तुम्ही या वेळीं–सत्वरी."

मराठी ग्रंथ संग्रहालय

* * *

[ ४ ]

झोंपडींत खाटेवरती
असतां मी एके रातीं–सुन्दरी !
मजकडे चारु तव मूर्ति
येतांना मज दिसली ती–सुन्दरी !
तूं नव्हे—मूर्ति करुणाची
अवतरे मजपुढें साची–सुन्दरी !
वाहती
अश्रुच्या तती,
श्वास चालती,
नीर तव गालीं
येउनि तुज न्हाऊं घाली–सुन्दरी !

[ ५ ]

“हा ! प्रिया !” मजकडे ह्मणुनी
धाव तुवां घेतां बघुनी–सुन्दरी !
शय्येवर उठुनी बसलों
“हो दूर–” असें तुज वदलों–सुन्दरी !
“पाहिलें तुला मीं नयनीं,
तूंही पण बघ मज दुरुनी–सुन्दरी !
मज हात
लावितां घात
तुझा बघ यांत
ह्मणुनि मजजवळी
येइं न तूं या अवकाळीं–सुन्दरी !”

[ ६ ]

हे बोल पुरे नच झाले
तों तव कर कंठीं आले–सुन्दरी !
चुंबिलें तुवां मम गाला
प्रेमानें वेळोवेळां–सुन्दरी !
निश्चला सार्थ दृष्टीसी
मजकडे लावुनी वदसी–सुन्दरी !
“हें जिणें
आपणांविणें
व्यर्थ कंठणें
नको ती पाळी,
मरण बरें मज या काळीं!”–सुन्दरी !

[ ७ ]

हा स्वार्थत्याग प्रेमीं
पाहतां हर्षलों अति मी—सुन्दरी !
लावुनियां दृष्टि नभांत
देवास जोडुनी हात—सुन्दरी !
प्रार्थिलें:—“दयाळा ! मजला
मरण दे याच समयाला—श्रीहरी !
भासतो
प्रीतिकळस तो
मजसि हाच—” तों
जागृती आली
स्वप्नस्थिति मजला कळली—सुन्दरी !



## कुसुम ९ वें.

# झपूर्झा !

[ आपल्यास जें कांहीं नाहीं असें वाटतें, त्यांतूनच महात्मे जगाच्या कल्याणाच्या चिजा बाहेर काढितात. त्या महात्म्यांची स्थिति लक्ष्यांत वागवून पुढील गाणें वाचिल्यास, तें दुर्बोध होऊं नये असें वाटतें. ]

हर्षखेद ते मावळले,
हास्य निवालें,
अश्रु पळाले;
कण्टकशल्यें बोंथटलीं,
मखमालीची लव वठली;
कांहीं न दिसे दृष्टीला,
प्रकाश गेला,
तिमिर हरपला;
काय ह्मणावें या स्थितिला ?—
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! १

हर्षशोक हे ज्यां सगळें,
त्यां काय कळे ?
त्यां काय वळे ?
हंसतिल जरि तें आह्मांला,
भय न धरूं हें वदण्यालाः—
व्यर्थी अधिकची अर्थ वसे,
तो त्यांस दिसे
ज्यां ह्मणति पिसे.
त्या अर्थाचे बोल कसे ?—
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! २

ज्ञाताच्या कुंपणावरून,
धीरत्व धरून
उड्डाण करून,
चिद्घनचपला[1] ही जाते,
नाचत तेथें चकचकते;
अंधुक आकृति तिस दिसती,
त्या गातातीं
निगूढ गीति;
त्या गीतींचे ध्वनि निघती—
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ३


नांगरल्याविण भुई बरी
असे कितितरी;
पण शेतकरी
सनदी तेथें कोण वदा ?—
हजारांतुनी एकादा !
तरी न, तेथुनि वनमाला
आणायाला,
अटक तुह्मांला;
मात्र गात हा मंत्र चला—
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१ कल्पना.

पुरुषाशीं त्या रम्य अति
नित्य प्रकृति
क्रीडा करती;
स्वरसंगम त्या क्रीडांचा
ओळखणें, हा ज्ञानाचा
हेतु; तयाची सुन्दरता
व्हाया चित्ता–
प्रत ती ज्ञाता,
वाडें कोडें गा आतां—
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ५

सूर्य चन्द्र आणिक तारे
नाचत सारे
हे प्रेमभरें
खुडित खपुष्पें फिरति जिथें,
आहे जर जाणें तेथें,
धरा जरा निःसंगपणा,
मारा फिरके,
मारा गिरके,
नाचत गुंगत ह्मणा ह्मणा—
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ६



प्रीति, चारुता, आनन्द,
यांचे गा मधुरच्छन्द;
प्रीति, चारुता, आनन्द
सिंचिति सृष्टीचा कन्द ! १३

वरुनि नभांतुनि चंडोल
ओतीतसे हेचि बोल;
खालीं तव गुंजारव हा
प्रतिपादितसे तेंचि अहा ! १४

होईल का रसिकता तव लब्ध मातें ?
गुंगी मिळेल मजला तव केधवां ते ?
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें,
वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावें !



REFBK-0000225